# लोकपाल
# आणि
# लोकायुक्त
# अधिनियम, २०१३



## (सन २०१४ चा १ ला)

## (दि. १ जानेवारी २०१४ ला संमत)

# भाग - १

# प्राथमिक

**१. लघु शीर्षक, व्याप्ती, उपाययोजन आणि प्रारंभ -**

१) अधिनियमाचे नाव लोकपाल व लोकायुक्त अधिनियम, २०१३ असेल.

२) या अधिनियमाची व्याप्ती संपूर्ण भारतभर असेल.

३) हा अधिनियम भारत व भारताबाहेरील लोकसेवकांना लागू असेल.

४) केन्द्र शासन त्याचे अधिकृत राजपत्रात नियुक्त करील, त्या दिनांकास अधिसूचनेद्वारा हा अधिनियम अंमलात येईल.

# भाग - २

# संघराज्यासाठी लोकपाल

## प्रकरण पहिले

## व्याख्या

**२. व्याख्या - १. या अधिनियमात संदर्भानुसार भिन्न अर्थ आवश्यक ठरत नाही-**

अ) ''खंडपीठ'' अर्थात लोकपालाचे खंडपीठ.

ब) ''अध्यक्ष'' अर्थात लोकपालाचा अध्यक्ष.

क) ''सक्षम प्राधिकारी'' च्या संदर्भात-

१. प्रधानमंत्री, अर्थात लोकसभा

२. मंत्रीमंडळाचा सदस्य, अर्थात प्रधानमंत्री

३. मंत्र्याव्यतिरिक्त संसदेचा सदस्य, अर्थात-

अ) राज्यसभेचा सदस्य असेल तर, राज्यसभेचे अध्यक्ष आणि

ब) लोकसभेचा सदस्य असेल तर लोकसभेचे सभापती.

४. केन्द्र शासनाच्या कोणत्याही मंत्रालयाचा किंवा विभागाचा अधिकारी, अर्थात मंत्रालयाचा किंवा विभागाचा पदभार असलेला मंत्री ज्यात सदर अधिकारी सेवा बजावत आहे.

५. कोणत्याही मंडळाचा वा संस्थेचा वा निगमाचा वा प्राधिकरणाचा वा संघटनेचा वा स्वायत्त संस्थेचा अध्यक्ष किंवा सदस्य (कोणतेही नामाभिधान धारण केले असेल) जे संसदेच्या अधिनियमांतर्गत स्थापन झाले आहे किंवा पूर्णतः वा अंशतः केन्द्र शासनाद्वारे वित्तपुरवठा केलेले आहे किंवा नियंत्रित आहे. अर्थात अशा संस्थेच्या वा निगमाच्या वा प्राधिकरणाचा वा संघटनेचा वा स्वायत्त संस्थेचे प्रशासकीय मंत्रालयाचा पदभार असलेला मंत्री.

६. कोणत्याही मंडळाचा वा संस्थेचा वा निगमाचा वा प्राधिकरणाचा वा संघटनेचा वा स्वायत्त संस्थेचा अधिकारी (कोणतेही नामाभिधान धारण केले असेल) जे संसदेच्या अधिनियमांतर्गत स्थापन झाले आहे किंवा पूर्णतः वा अंशतः केन्द्र शासनाद्वारे वित्तपुरवठा केलेले आहे. किंवा नियंत्री आहे. अर्थात अशा संस्थेच्या वा निगमाच्या वा प्राधिकरणाचा वा संघटनेचा वा स्वायत्त संस्थेचा विभागप्रमुख.

७. उपखंड १ ते ६ मध्ये न मोडणाऱ्या इतर कोणत्याही प्रकरणासाठी, अर्थात असा विभाग किंवा प्राधिकारी, जो केन्द्रशासनाच्या अधिसूचनेनुसार निश्चित केला आहे.

उपखंड (५) किंवा (६) मध्ये संदर्भित कोणतीही व्यक्ती संसद सदस्य असेल, तर सक्षम प्राधिकारी.

अ) राज्यसभेचा सदस्य असेल तर, राज्यसभेचे अध्यक्ष.

ब) लोकसभेचा अध्यक्ष असेल तर, लोकसभेचे सभापती.

ड) ''केन्द्रीय दक्षता आयोग'' अर्थात केन्द्रीय दक्षता आयोग अधिनियम, २००३ च्या कलम ३ च्या उप-कलम १ नुसार घटीत केन्द्रीय दक्षता आयोग.

इ) ''तक्रार'' अर्थात अशी तक्राम जी सूचित नमुन्यात केले असून, ज्यात एखाद्या लोकसेवकाने भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ नुसार दंडनीय अपराध केला आहे, असा आरोप केलेला आहे.

फ) ''दिल्ली विशेष पोलीस आस्थापना'' अर्थात दिल्ली विशेष पोलीस आस्थापना अधिनियम, १९४६ च्या कलम २ च्या उपकलम १ नुसार घटीत दिल्ली विशेष पोलीस आस्थापना होय.

ग) ''तपास'' अर्थात फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २ च्या खंड ह नुसार झालेला तपास.

ह) ''न्यायिक सदस्य'' अर्थात लोकपालाचा न्यायिक सदस्य होय.

इ) ''लोकपाल'' अर्थात कलम ३ नुसार स्थापित मंडळ होय.

ज) ''सदस्य'' अर्थात लोकपालाचा सदस्य.

क) ''मंत्री'' अर्थात केन्द्रीय मंत्री परंतु यात प्रधानमंत्री समाविष्ट नाही.

ल) ''अधिसूचना'' अर्थात अधिकृत राजपत्रात प्रसिद्ध अधिसूचना आणि अधिसूचित करणे या अभिव्यक्तीचे विवेचन त्यानुसार केले जाईल.

म) ''प्राथमिक चौकशी'' अर्थात या अधिनियमान्वयेकेलेली चौकशी.

न) ''सूचित'' अर्थात या अधिनियमातील नियमांद्वारे सूचित

उ) ''लोक सेवक'' अर्थात कलम १४ च्या उपकलम १ च्या खंड (अ) ते (ह) मध्ये संदर्भित व्यक्ती मात्र यात सेना अधिनियम, १९५०, वायू सेना अधिनियम, १९५०, नौदल अधिनियम, १९५७ आणि तटरक्षक दल अधिनियम, १९७८ द्वारे स्थापित कोणत्याही न्यायालयाद्वारे वापर करावयाच्या अधिकारक्षेत्र लागू असलेल्या किंवा अशी कार्यपद्धती लागू असलेल्या लोकसेवकाचा यात समावेश होत नाही.

प) ''विनियमने'' या अधिनियमात बनविलेली विनियमने.

का) ''नियम'' या अधिनियमात बनविलेले नियम.

र) ''परिशिष्ट'' अर्थात या अधिनियमास जोडलेले परिशिष्ट.

स) ''विशेष न्यायालये'' अर्थात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ३ च्या उपकलम १ नुसार नियुक्त विशेष न्यायाधिशाचे न्यायालय होय.

२) या अधिनियमात वापर केलेले परंतु व्याख्या न केलेले पण भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ मध्ये व्याख्या केलेले शब्द आणि अभिव्यक्तीचा अर्थ त्या अधिनियमानुसार असेल.

३) इतर कोणत्याही अधिनियमाबद्दल किंवा त्यातील तरतुदींबद्दल, ज्यांचा उल्लेख या अधिनियमात झाला आहे, एखाद्या विशिष्ट प्रदेशास लागू नसतील जिथे हा अधिनियम लागू आहे. तिथे संबंधित प्रदेशात लागू असलेल्या सुसंगत अधिनियम किंवा तरतुदीनुसार विवेचित व्हावा.

## प्रकरण दूसरे
## लोकपालाची स्थापना

**१. लोकपालाची स्थापना :-**

१) या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यापासून, यातील उद्देशांकरिता, लोकपाल नावाची संस्था स्थापीत झालेली असेल.

**२. लोकपालात :-**

अ) अध्यक्ष, जो भारताचा सरन्यायाधीश आहे किंवा राहीला असेल किंवा सर्वोच्च न्यायालयाचा न्यायमूर्ति आहे किंवा राहीला असेल किंवा अशी सुप्रसिद्ध व्यक्ती जी उपकलम (३) चा खंड (ब) मधील पात्रता निकष पूर्ण करणारी असेल आणि

ब) आणि सदस्य, ज्यांची संख्या ८ पेक्षा अधिक असणार नाही आणि ज्यातील पन्नास टक्के सदस्य हे न्यायिक सदस्य असतील.

परंतु असे की, लोकपालातील पन्नास टक्क्यांहून कमी होणार नाही इतके सदस्य हे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्यांक आणि स्त्रिया यापैकी असतील.

**३. एखादी व्यक्ती न्यायिक सदस्य म्हणून नियुक्तीस पात्र असेल, जर -**

अ) तो सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा राहीला असेल किंवा एखाद्या उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ति आहे किंवा राहीला असेल.

ब) न्यायिक सदस्याव्यतिरिक्त, जर तो अक्षुन्य निष्ठा आणि सर्वोच्च क्षमतेची व्यक्ती असेल तसेच भ्रष्टाचार विरोधी धोरण, लोकप्रशासन, दक्षता, अर्थ ज्यात वीमा आणि बँकींगचा, विधि आणि व्यवस्थापन यांच्यासंबंधी प्रकरणे हाताळण्याचा २५ पेक्षा कमी नाही इतक्या वर्षांचे विशेष ज्ञान व तज्ञ असलेला असावा.

४) अध्यक्ष किंवा सदस्य -

१) संसद सदस्य किंवा कोणत्याही राज्याच्या किंवा केन्द्र शासित प्रदेशाच्या विधान मंडळाचे सदस्य नसावेत.

२) नैतिक अधःपतनासाठीच्या कोणत्याही अपराधासाठी शिक्षा झालेला नसावा.

३) सदस्य म्हणून पदभार स्विकारण्याच्या दिनांकास वयाच्या पंचेचाळीस वर्षापेक्षा कमी नसावेत.

४) कोणत्याही पंचायत किंवा नगर पालिकेचे सदस्य नसावेत.

५) संघराज्य किंवा राज्यांच्या सेवेतून काढलेले किंवा बरखास्त केलेला नसावा आणि विश्वास किंवा लाभाचे कोणतेही पद (अध्यक्ष किंवा सदस्याचा पदभाराव्यतिरिक्त) धारण केलेला नसावा किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसावा किंवा कोणताही व्यवसाय, धंदा करणारा नसावा व त्यानुसार, एखादी व्यक्ती अध्यक्ष किंवा सदस्य या नात्याने नियुक्त झाल्यास ती-

अ) एखादे विश्वास किंवा लाभाचे पद धारण केलेली असेल तर, अशा पदाचा त्याग किंवा

ब) जर एखादा व्यापार करत असेल तर अशा व्यवसायाचे संचालन आणि व्यवस्थापनाशी असलेला संबंध तोडून टाकील, किंवा

क) जर एखादा व्यवसाय करत असल्यास, असा व्यवसाय करणे थांबवील.

**४. निवड समितीच्या शिफारशींनुसार अध्यक्ष आणि सदस्यांची निवड करणे -**

१) अध्यक्ष आणि सदस्यांच्या नेमणूका राष्ट्रपतींद्वारे निवड समितीच्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतर केल्या जातील. निवड समितीत खालील सदस्यांचा समावेश राहील-

अ) प्रधानमंत्री-अध्यक्ष

ब) लोकसभेचे सभापती-सदस्य

क) लोकसभेतील विरोधी पक्ष नेते-सदस्य

ड) भारताचे सरन्यायाधीश किंवा त्याच्याद्वारे नामनिर्देशीत सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश-सदस्य.

क) वरील खंड (अ) ते (ड) मधील सदस्य आणि अध्यक्षांनी शिफारस केलेला आणि राष्ट्रपतींनी नामनिर्देशीत केलेला कायदेपंडीत-सदस्य

२) निवड समितीत एखादे पद रिक्त राहीले या कारणास्तव अध्यक्ष किंवा सदस्य यांची नेमणूक अवैध ठरणार नाही.

३) निवड समिती लोकपालाचे अध्यक्ष आणि यांची निवड करण्याच्या उद्देशाने आणि अशा नियुक्तीसाठी लक्षात घ्यावयाच्या व्यक्तींची नामिका (पॅनेल) करण्यासाठी भ्रष्टाचार विरोधी धोरण, लोकप्रशासन, दक्षता, अर्थ ज्यात विमा आणि बँकींगचा, विधि आणि व्यवस्थापन यांच्यासंबंधी किंवा निवड समितीस लोकपाल अध्यक्ष आणि सदस्य यांच्या नियुक्तीस प्रकरणे हाताळण्याचे विशेष ज्ञान व अनुभव असलेल्या किमान ७ व्यक्तींची शोधसमिती स्थापन करील.

परंतु असे की, शोधसमितीच्या सदस्यांपैकी पन्नास टक्क्यांहून कमी होणार नाही इतके सदस्य हे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्यांक आणि स्त्रिया यातून निवडलेले असतील.

परंतु आणखी की शोधसमितीने शिफारस केलेल्या व्यक्तीशिवाय इतर व्यक्तीही निवड समिती लक्षात घेऊ शकते.

४) अध्यक्ष आणि सदस्य यांची निवड करताना निवड समिती आपल्या कार्यपद्धतीचे विनियमन पारदर्शक पद्धतीने करील.

५) उप-कलम ३ मध्ये उल्लेख शोधसमितीचा कार्यकाल, तिच्या सदस्यांना देय असणारे शुल्क व भत्ते आणिपालिकेच्या सदस्यांची निवड करण्याची पद्धती विहित केल्याप्रमाणे राहील.

**५. अध्यक्ष किंवा सदस्य यांच्या रिक्त जागा भरणे -**

विद्यमान अध्यक्ष किंवा सदस्य, प्रकरणपरत्वे, यांचा कार्यकाल पूर्ण होण्याच्या किमान तीन महिने आधीपासून, या अधनियमात विहित केलेल्या पद्धतीनुसार नवीन अध्यक्ष किंवा सदस्य यांची निवड करण्यासाठी राष्ट्रपती आवश्यक ती सर्व पावले उचलतील किंवा त्यास कारणीभूत होतील.

**६. अध्यक्ष किंवा सदस्य यांचा कार्यकाल -**

निवड समितीच्या शिफारशीनुसार, अध्यक्ष आणि प्रत्येक सदस्य यांची राष्ट्रपतींद्वारा त्यांच्या सही-शिक्क्याने जारी वॉरंटनुसार नियुक्ती केली जाईल, जिचा कार्यकाल पदभार स्विकारल्यापासून ५ वर्षे इतका किंवा वयाची सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत, जे कोणते आधी लागू होईल त्याप्रमाणे असेल.

परंतु असे की तो -

अ) आपल्या हस्ताक्षरात राष्ट्रपतींच्या नावे लिहून, पदाचा राजीनामा देऊ शकतो.

ब) कलम ३७ मधील तरतुदीनुसार पदावरून हटविला जाऊ शकतो.

**७. अध्यक्ष किंवा सदस्यांचे वेतन, भत्ते आणि इतर सेवाशर्ती -**

अ) अध्यक्षांचे बाबतीत, भारताचे सरन्यायाधीश यांच्यासारख्याच राहतील.

ब) इतर सदस्यांच्या बाबतीत, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांसारख्याच असतील.

परंतु असे की, जर अध्यक्ष किंवा सदस्य, नेमणुकीवेळी, भारत सरकार किंवा राज्य शासनाच्या भूतपूर्व सेवेसाठीच्या (विकलांगता निवृत्तीवेतनाशिवाय) निवृत्तीवेतन धारक असेल तर अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून केलेल्या सेवेसाठी वेतनाची रक्कम-

अ) त्या निवृत्तीवेतनाएवढी कमी करावी.

ब) जर, त्यास नियुक्तीच्या आधी, अशा मागील सेवेसाठी देय असलेल्या निवृत्तीवेतनाच्या भागाच्या बदल्यात रक्कम मिळाल्यास, निवृत्तीवेतनाच्या त्या भागाच्या अंशराशीकृत वेतनाच्या मूल्याएवढी कमी करावी.

परंतु असे की, अध्यक्ष किंवा सदस्य यांच्या नियुक्तीनंतर, त्यांना देय असणारे भत्ते, वेतन आणि इतर सेवाशर्ती त्यांच्या हितास बाधा होतील अशा रीतीने बदलता येणार नाहीत.

**८. पद सोडल्यानंतर अध्यक्ष आणि सदस्य यांच्या सेवायोजनांवर बंधने -**

१. पद सोडल्यानंतर अध्यक्ष आणि प्रत्येक सदस्य हे -

१) लोकपालाचे सदस्य किंवा अध्यक्ष म्हणून पुनर्नियुक्त होण्यास

२) कोणत्याही राजनैतिक कार्यासाठी केन्द्रशासीत प्रदेशाचा प्रशासक म्हणून नियुक्त होण्यास आणि इतर अशा नियुक्तीसाठी किंवा कार्यासाठी विधिनुसार राष्ट्रपतींना त्यांचे सही शिक्क्यानिशी वॉरंट जारी करावे लागते.

३) भारत सरकार किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही लाभाच्या पदावर सेवायोजित होण्यास;

४) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती किंवा संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्यपदाची किंवा कोणत्याही राज्य विधान मंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या सदस्यपदाची किंवा नगर पालिका वा पंचायतीची निवडणूक पद सोडल्याचे दिनांकापासून ५ वर्षांपर्यंत लढविण्यास अपात्र राहील.

२. उपकलम १ मध्ये काहीही अंतूर्भत असले तरी, एखाद्या सदस्याचा सदस्य आणि अध्यक्षपदाचा कार्यकाल ५ वर्षापेक्षा अधिक नसेल तर तो अध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास पात्र असेल.

**स्पष्टीकरण :-** या कलमातील उद्देशांकरिता इथे स्पष्ट करण्यात येते की, जिथे सदस्यांची अध्यक्षपदावर नियुक्ती झाली आहे, अशा सदस्याचा सदस्य आणि अध्यक्षपदाचा एकूण कार्यकाल हा ५ वर्षपेक्षा अधिक असणार नाही.

**९. विशिष्ट परिस्थितीत सदस्यास अध्यक्षाची कर्तव्ये पार पाडावी लागणे -**

१. राजीनामा, मृत्यु किंवा इतर कारणामुळे अध्यक्षपद रिक्त झाल्यास, राष्ट्रपती अधिसूनचेद्वारे सर्वात ज्येष्ठ सदस्यास ते रिक्त पद भरले जाण्यासाठी नवीन नियुक्ती होईपर्यंत अधिकृत करू शकतात.

२. जेव्हा अध्यक्ष हे रजा किंवा इतर कारणामुळे त्यांची कर्तव्ये पार पाडू शकत नाहीत, राष्ट्रपती हे सर्वात ज्येष्ठ सदस्यास अध्यक्षांनी त्यांच्या कर्तव्यास सुरुवात करेपर्यंत, अध्यक्षाची कर्तव्ये पार पाडण्यास अधिकृत करू शकतात.

**१०. लोकपाल सचिव, इतर अधिकारी आणि इतर कर्मचारी वृंद -**

१. भारत सरकार सचिव श्रेणीचा एक सचिव लोकपालाला असेल, ज्याची नेमणूक अध्यक्ष केन्द्र शासनाने पाठविलेल्या नामिकेतून करतील.

२. एक चौकशी संचालक आणि एक अभियोग संचालक, जे भारत सरकारच्या अतिरिक्त सचिवा दर्जाच्या कमी नसतील किंवा समकक्ष असतील, त्यांची नियुक्ती अध्यक्ष केन्द्र शासनाने पाठविलेल्या नामिकेतून करतील.

३. लोकपालाचे इतर अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती अध्यक्ष किंवा अध्यक्ष ज्या सदस्यास निर्देश देतील अशा सदस्यांद्वारे केली जाईल.

परंतु असे की, कोणत्याही पद/पदांवरच्या नियुक्तीबाबत राष्ट्रपती नियमात स्पष्ट केल्याप्रमाणे अशा नियुक्ती या केन्द्रीय लोकसेवा आयोगाशी सल्ला मसलत करून केल्या जाव्यात असे आवश्यक करू शकतात.

४. संसदेने बनविलेल्या कोणत्याही अधिनियमातील तरतुदींच्या विषयाधीन राहून, सचिव, इतर अधिकारी आणि कर्मचारी वृंद यांच्या सेवाशर्ती लोकपालांनी तयार केलेल्या विनियमनात सुस्पष्ट केल्याप्रमाणे राहतील.

परंतु असे की, या उप-कलमात बनविण्यात आलेल्या विनियमनांनुसार असे विनियम हे वेतन, भत्ते, रजा अथवा निवृत्ती वेतन यांच्याशी संबंधीत आहेत, त्यांना राष्ट्रपतींची मान्यता मिळविणे आवश्यक राहील.

## प्रकरण तीसरे

# चौकशी विभाग

**११. चौकशी विभाग -**

१. सध्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही विधित काहीही अंतर्भूत असले तरी, लोकपाल हा लोकसेवकाने भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये दंडनीय अपराध केलेल्या आरोपांची प्राथमिक चौकशी करण्यासाठी संचालकाच्या नेतृत्वाखाली एक चौकशी विभाग निर्माण करील.

परंतु असे की, लोकपालाद्वारे अशा चौकशी विभागाची स्थापना होईपर्यंत केन्द्र शासन हे त्याचे विभाग व मंत्रालयातून आवश्यक संख्येइतका अधिकारी किंवा कर्मचारी वृंद या अधिनियमातील प्राथमिक चौकशी करण्यासाठी उपलब्ध करून देईल.

२. लोकपालास प्राथमिक चौकशी करण्यासाठी सहाय्य करण्यासाठी, चौकशी विभागाचे अधिकारी, जे भारत सरकारच्या अवर सचिवाच्या श्रेणीच्या निम्न नसतील. त्यांना लोकपालाच्या चौकशी विभागास कलम २७ अन्वये मिळालेल्या शक्तींसारख्याच शक्ती असतील.

# प्रकरण चौथे
# अभियोग विभाग

**१२. अभियोग विभाग -**

१. लोकपाल हे अधिसूचनेद्वारे, अभियोग संचालकाच्या मार्गदर्शनाखाली लोकपालाकडे या अधिनियमातील तरतुदींतर्गत केलेल्या कोणत्याही तक्रारीसाठी लोकसेवकांच्या अभियोगासाठी एक अभियोग विभाग स्थापन करतील.

परंतु असे की, लोकपालाद्वारे अशा चौकशी विभागाची स्थापना होईपर्यंत केन्द्र शासन हे त्याचे विभाग व मंत्रालयातून आवश्यक संख्येइतका अधिकारी किंवा कर्मचारी वृंद या अधिनियमातील प्राथमिक चौकशी करण्यासाठी उपलब्ध करून देईल.

२. चौकशी विभागाचे संचालक, लोकपालाद्वारे निर्देश मिळाल्यानंतर, चौकशी अहवालातील निष्कर्षाप्रमाणे विशेष न्यायालयात प्रकरण दाखल करतील आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या तरतुदींनुसार दंडास पात्र अशा लोकसेवकांच्या कोणत्याही अपराधाच्या अभियोगासाठी आवश्यक ती सर्व पाऊले उचलतील.

३. उपकलम २ अंतर्गत असलेले प्रकरण हे, तपास पूर्ण झाल्यानंतर फौजदारी दंड संहितेच्या कलम १७३ मध्ये केल्यानुसार दाखल झालेला अहवाल मानला जाईल.

# प्रकरण पाचवे
# लोकपालाच्या व्यय भारताच्या संचित निधीतून भागविले

**१३. लोकपालाचा व्यय हा भारताच्या संचित निधीतून भागविणे :-**

लोकपालाचा प्रशासकीय खर्च, ज्यात सर्व वेतन, भत्ते, निवृत्ती वेतन जे अध्यक्ष, सदस्य किंवा सचिव किंवा इतर अधिकारी किंवा कर्मचारी वृंदास किंवा संबंधी देय आहे, भारताच्या संचित निधीतून भागविला जाईल आणि लोकपालाद्वारे स्वीकारला गेलेला पैसा आणि इतर शुल्क हे भारताच्या संचित निधीत जमा केले जातील.

## प्रकरण सहावे

# चौकशी संदर्भात अधिकार क्षेत्र

**१४. लोकपालाच्या अधिकारक्षेत्रात प्रधानमंत्री, संसद सदस्य, गट अ, ब, क, ड आणि केन्द्र शासनाचे अधिकारी यांचा समावेश :-**

१) या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीन राहून, लोकपाल खालील व्यक्तींबाबत किंवा त्यांच्या सहभागामुळे निर्माण होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या कोणत्याही आरोपाची चौकशी करील किंवा करण्यास कारण ठरेल.

अ) कोणतीही व्यक्ती जी प्रधानमंत्री आहे किंवा राहीली आहे.

परंतु असे की लोकपाल पंतप्रधानाविरोधातील भ्रष्टाचाराच्या अशा कोणत्याही आरोपाची जे-

१) आंतरराष्ट्रीय संबंध, बहिस्थ आणि अंतर्गत सुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था, आण्विक उर्जा आणि अंतराळ यासंबंधी असेल.

२) जोपर्यंत लोकपालाचे पूर्णपीठ ज्यात लोकपाल अध्यक्षाचाही समावेश आहे सर्व सदस्य चौकशी प्रारंभ करण्याच्या मताचे आहेत आणि किमान दोन तृतीयांश सदस्यांनी अशा चौकशीला मान्यता देत नाहीत.

चौकशी करणार नाही ज्यामुळे किंवा ज्यात पंतप्रधानांविरोधात भ्रष्टाचाराचा आरोप आहे.

अ) परंतु असे की, अशी चौकशी ही गुप्त पद्धतीने (इन कॅमेरा) केली जाईल आणि जर लोकपाल तक्रार फेटाळणे योग्य आहे अशा निर्णयास आले तर, अशा चौकशीचे अभिलेख हे प्रसिद्ध केले जाऊ नयेत किंवा कोणलाही उपलब्ध केले जाऊ नयेत.

ब) कोणतीही व्यक्ती जी केन्द्रीय मंत्रीमंडळाची सदस्य आहे किंवा होती;

क) कोणतीही व्यक्ती जी संसदेच्या एका गृहाची सदस्य आहे किंवा होती;

ड) लोकसेवकांपैकी संघराज्यासंबंधीत प्रकरणातील कोणताही गट 'अ' किंवा गट 'ब' अधिकारी किंवा समकक्ष वा वरिष्ठ ज्याची व्याख्या भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनिय, १९८८ च्या कलम २ च्या खंड क च्या उपखंड (१) आणि (२) मध्ये केली आहे सेवारत असताना किंवा पश्चात.

इ) लोकसेवकांपैकी संघराज्यासंबंधीत प्रकरणातील कोणताही गट 'क' किंवा गट 'ड' अधिकारी किंवा समकक्ष वा वरिष्ठ ज्याची व्याख्या भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम २ च्या खंड क च्या उपखंड (१) आणि (२) मध्ये केली आहे सेवारत असताना किंवा पश्चात, कलम २० चे उपकलम १ चे अधीन राहून.

फ) कोणतीही व्यक्ती, जी कोणत्याही मंडळाचा वा संस्थेचा वा निगमाचा वा प्राधिकरणाचा वा संघटनेचा वा स्वायत्त संस्थेचा अध्यक्ष किंवा सदस्य (कोणतेही नामाभिधान धारण केले असेल) जे संसदेच्या अधिनियमांतर्गत स्थापन झाले आहे किंवा पूर्णतः वा अंशतः केन्द्र शासनाद्वारे वित्तपुरवठा केलेले आहे किंवा नियंत्रीत आहे.

परंतु असे की, खंड ड मध्ये उल्लेख केलेल्या अधिकाऱ्यांबाबतीत ज्यांनी खंड इ मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही संस्था, मंडळ, निगम किंवा प्राधिकरण किंवा मंडळ किंवा संस्थेत अथवा न्यासात किंवा संघराज्याशी संबंधीत बाबीत सेवा बजावली आहे मात्र राज्याशी संबंधीत बाबीत सेवा बजावत आहेत किंवा कोणत्याही मंडळाचा वा संस्थेचा अध्यक्ष किंवा सदस्य (कोणतेही नामाभिधान धारण केले असेल) जे संसदेच्या अधिनियमांतर्गत स्थापन झाले आहे किंवा पूर्णतः या अंशतः राज्य शासनाद्वारे वित्तपुरवठा केलेले आहे किंवा नियंत्रीत आहे, लोकपाल व त्यांचे चौकशी विभागाचे किंवा अभियोग विभागाचे अधिकारी यांना अधिनियमानुसार अशा अधिकाऱ्यांबाबतीत संबंधीत राज्य शासनाकडून अनुमती मिळाल्यावरच न्यायाधिकारक्षेत्र लागू राहील.

ग) कोणतीही व्यक्ती जी कोणत्याही इतर संस्था, व्यक्तींची संघटना किंवा न्यास (अस्तित्वात असलेल्या वा नसलेल्या कोणत्याही अधिनियमानुसार नोंदणी झालेला असेल) व कोणतेही नामाभिधान धारण केलेले असेल जे शासनाद्वारे पूर्णतः किंवा अंशतः वित्तपुरवठा केलेले असेल आणि ज्याचे वार्षिक उत्पन्न केन्द्र शासनाने अधिसूचित केल्यापेक्षा अधिक असेल.

ह) कोणतीही व्यक्ती जी कोणत्याही इतर संस्था, व्यक्तींची संघटना किंवा न्यास (अस्तित्वात असलेल्या वा नसलेल्या कोणत्याही अधिनियमानुसार नोंदणी

झालेला असेल) व कोणतेही नामाभिधान धारण केलेले असेल विदेशी स्त्रोताकडून विदेशी योगदान (विनियमन) अधिनियम, २०१० नुसार दहा लक्ष रुपयांपेक्षा किंवा केन्द्र शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे अधिक देणगी एका वर्षात स्विकारत असेल.

**स्पष्टीकरण :-**

१) खंड (फ) (ग) यांच्या उद्देशाकरिता, हे स्पष्ट केले आहे की, कोणतीही संस्था वा व्यक्ती, कोणतेही नामाभिधान धारण करणारी असेल, निगम, संस्था, न्यास, व्यक्तींचे संघटन, भागीदारी, एकल मालकी, मर्यादीत दायित्व, भागीदारी (अस्तित्वात असलेल्या वा नसलेल्या कोणत्याही अधिनियमानुसार नोंदणी झालेली) वरील खंडात समाविष्ट असतील.

परंतु असे की, या खंडात उल्लेखलेल्या कोणत्याही व्यक्तीस भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम २ च्या खंड (क) नुसार लोकसेवकच मानले जाईल आणि त्या अधिनियमाच्या तरतुदी, त्यानुसार लागू होतील.

२) उपकलम १ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, संसदेच्या कोणत्याही सदनाचा सदस्याने केलेल्या वक्तव्याबद्दल किंवा समितीमध्ये अथवा संसदेत केलेल्या मतदानाशी संबंधीत किंवा त्यामुळे निर्माण झालेल्या अशा कोणत्याही प्रकरणाची चौकशी करणार नाही, जे घटनेच्या कलम १०५ च्या खंड (२) च्या तरतुदीत समाविष्ट आहेत.

३) लोकपाल हे उपकलम (१) मध्ये उल्लेखलेल्या व्यक्तींखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीच्या कृती अथवा वर्तनाबद्दल चौकशी करू शकतात, जर अशी व्यक्ती ही षडयंत्र, लाच देणे किंवा लाच घेणे किंवा भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ नुसार भ्रष्टाचाराचे आरोपात सहभागी असेल.

परंतु असे की, जर एखादी व्यक्ती राज्याशी संबंधीत बाबीत सेवारत असेल तर त्या राज्याच्या शासनाचे अनुमतीशिवाय कोणतीही कार्यवाही या कलमांतर्गत केली जाणार नाही.

४) लोकपालाकडे तक्रार स्वरूपात प्राप्त झालेले कोणतेही प्रकरण हे चौकशीसाठी, चौकशी आयोग अधिनियम, १९५२ अन्वये पाठविले जाणार नाही.

**स्पष्टीकरण :-**

संशयाच्या निरसनासाठी, इथे घोषीत करणेत येते की, या अधिनियमान्वये केलेली तक्रार ही केवळ त्या काळापुरती संबंधीत असेल, ज्या दरम्यान लोकसेवक पदावर होता अथवा त्या शक्तीने कार्यरत होतात.

**१५. लोकपालाच्या चौकशीसाठी कोणत्याही न्यायालय, समिती किंवा प्राधिकाऱ्यासमोर प्रलंबीत असलेले प्रकरण प्रभावीत न होणे :-** जर एखादे प्रकरण, कार्यवाही जी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये भ्रष्टाचाराच्या आरोपाशी संबंधीत आहे, कोणत्याही न्यायालय, संसदेच्या कोणत्याही सदनातील समिती किंवा कोणत्याही प्राधिकाऱ्यासमोर, या अधिनियमाच्या प्रारंभाआधीपासून प्रलंबीत आहे, असे प्रकरण किंवा कार्यवाही ही अशा न्यायालय, समिती किंवा प्राधिकाऱ्यासमोरच चालू राहील.

**१६. लोकपालाच्या खंडपीठांची रचना :-**

१) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून-

अ) लोकपालाचे न्यायाधिकारक्षेत्र खंडपीठांद्वारे उपयोगात आणले जाईल.

ब) अध्यक्ष व त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे दोन वा अधिक सदस्यांचे खंडपीठ रचले जाईल.

क) प्रत्येक खंडपीठात साधारणपणे किमान १ सदस्य राहील.

ड) ज्या खंडपीठात अध्यक्ष असतील, अशा खंडपीठात अध्यक्षांची तरतूद केली जाईल.

इ) ज्या खंडपीठात न्यायिक सदस्य, गैर-न्यायिक सदस्य, जो अध्यक्ष नाही यांचा समावेश आहे. अशा खंडपीठात न्यायिक सदस्य हे अध्यक्ष असतील.

फ) लोकपालांचे खंडपीठ हे साधारणपणे नवी दिल्ली आणि लोकपाल नियमनात विनिर्दिष्ट करतील अशा इतर ठिकाणी बसतील.

२) लोकपाल हे प्रत्येक खंडपीठास त्याचे अधिकारक्षेत्राचा वापर करण्यासंबंधीत प्रदेश अधिसूचित करतील.

३) उप कलम २ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, वेळोवेळी खंडपीठांची रचना आणि पुनर्रचना करण्याचे अधिकार अध्यक्षांना असतील.

४) जर कोणत्याही प्रकरण अथवा खटल्यातील सुनावणीच्या कोणत्याही टप्प्यावर जर अध्यक्ष किंवा सदस्यास लक्षात आले की प्रकरण अथवा खटल्याचे स्वरूप हे तीन किंवा अधिक सदस्यांनीच सुनावणी करावी अशा स्वरूपाचे आहे, असे प्रकरण किंवा खटला हे अध्यक्षाकडून, किंवा प्रकरण तरत्वे, त्यास योग्य वाटेल अशा खंडपीठाकडे वर्ग करता येईल.

**१७. खडपीठामध्ये कामकाजाचे वाटप :-** जेथे खंडपीठ रचले आहे, तिथे अध्यक्ष हे वेळोवेळी अधिसूचनेद्वारा, लोकपालाचे कामकाज खंडपीठांमध्ये वितरीत करण्यासाठी तसेच प्रत्येक खंडपीठाने चालवण्याच्या प्रकरणांचीही तरतूद करतील.

**१८. प्रकरणे वर्ग करण्याचे अध्यक्षांची शक्ती :-** तक्रारदाराद्वारे किंवा लोकसेवकाद्वारे प्रकरण वर्ग करण्याचा अर्ज प्राप्त झाल्यावर अध्यक्ष, हे तक्रारदारास किंवा लोकसेवकास म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, एका खंडपीठासमोर प्रलंबीत असलेले कोणतेही प्रकरण दुसऱ्या खंडपीठाकडे वर्ग करतील.

**१९. बहुमताने निर्णय :-** जर समसंख्येने रचलेल्या खंडपीठाचे सदस्यांत कोणत्याही मुद्यावरून मतभेद झाले तर, ते मतभेदाचा मुद्दा वा मुद्दे स्पष्ट करतील आणि अध्यक्षाकडे प्रकरण सोपवतील, जे असा मुद्दा किंवा मुद्दे स्वतः ऐकतील किंवा अशा मुद्दा किंवा मुद्यांवरील प्रकरण लोकपालाच्या इतर सदस्याकडे सोपवतील, असा मुद्दा किंवा मुद्दे हे सदस्यांच्या बहुमताने निर्णित होतील. प्रकरण ऐकणाऱ्या सदस्यांत आधी ऐकलेल्या सदस्यांचाही समावेश असेल.

## प्रकरण सातवे

# प्राथमिक चौकशी आणि तपासाची कार्यपद्धती

**२०. तक्रार, प्राथमिक चौकशी आणि तपासाबाबतच्या तरतूदी :-**

१) एखादी तक्रार प्राप्त झाल्यानंतर, त्यावर पुढे जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर, लोकपाल-

अ) त्या प्रकरणात पुढील कार्यवाही करण्याइतपत सकृत दर्शनी कारण आहे हे सुनिश्चित करण्यासाठी आपल्या चौकशी विभागाद्वारे किंवा अन्य यंत्रणेद्वारे

(दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहित) कोणाही लोकसेवकाविरुद्ध प्राथमिक चौकशी करण्याचा आदेश देऊ शकतो; किंवा

ब) जिथे सकृतदर्शनी प्रकरण अस्तित्वात आहे त्याबाबत कोणत्याही यंत्रणेस (दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहित) तपासाचे आदेश देऊ शकतो.

परंतु असे की, जर लोकपालाने प्राथमिक चौकशी करून पुढे जाण्याचा निर्णय घेतला असेल तर, त्यास गट अ किंवा ब किंवा क किंवा ड च्या लोकसेवकांसंबंधी प्राप्त झालेल्या तक्रारी किंवा तक्रारींचा वर्ग किंवा तक्रार, साधारण किंवा विशेष आदेश जारी करून केन्द्रीय दक्षता आयोग अधिनियम, २००३ च्या कलम ३ च्या उपकलम १ नुसार स्थापित केन्द्रीय दक्षता आयोगाकडे सोपवेल.

परंतु असे की, खंड (ब) अन्वये तपासाचे आदेश देण्याआधी लोकपाल हे लोकसेवकाकडून स्पष्टीकरण मागवतील जेणेकरून तपासासाठी सकृत दर्शनी प्रकरण अस्तित्वात आहे का हे सुनिश्चित करता येईल.

परंतु आणखी असेही की, तपासाआधी लोकसेवकाकडून स्पष्टीकरण मागविण्यामुळे शोध व जप्ती, आवश्यक असेल तर, यात हस्तक्षेप होणार नाही आणि ती कोणत्याही यंत्रणेद्वारे करता येईल (दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहीत).

२) उपकलम १ मध्ये उल्लेखलेल्या प्राथमिक चौकशी दरम्यान, चौकशी विभाग किंवा इतर यंत्रणा (दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहीत) प्राथमिक चौकशी करतील आणि मिळविलेल्या माहिती, साहित्य आणि दस्तावेज यांच्या आधारे तक्रारीत केलेल्या आरोपांवर लोकसेवकाकडून आणि सक्षम अधिकाऱ्याकडून टिप्पणी मिळवतील व संदर्भ प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत अहवाल लोकपालास प्रस्तुत करतील.

३) लोकपालाचा तीनहून कमी सदस्य नसलेले खंडपीठ चौकशी विभागाकडून किंवा अन्य यंत्रणा (दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहीत) कडून उपकलम २ अन्वये प्राप्त झालेला प्रत्येक अहवाल विचारात घेईल आणि अशा लोकसेवकास त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, कोणते सकृतदर्शनी प्रकरण आहे का याचा निर्णय घेईल. त्यानंतर खालीलपैकी कृती करील-

अ) एखाद्या यंत्रणेद्वारे तपास किंवा प्रकरणपरत्वे, दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेद्वारा तपास;

ब) संबंधीत लोकसेवकाविरुद्ध विभागीय चौकशी किंवा इतर योग्य अशी कार्यवाही सुरू करणे.

क) लोकसेवकाविरुद्ध कार्यवाही बंद करणे आणि कलम ४६ अन्वये तक्रारविरुद्ध कार्यवाही करणे.

४) उपकलम १ मध्ये उल्लेख केलेली प्रत्येक प्राथमिक चौकशी ही साधारणपणे ९० दिवसांच्या आत पूर्ण होईल आणि तक्रार प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून कारण मीमांसा लिहिण्याकरीता आणखी ९० दिवसांचा कालावधी राहील.

५) जर लोकपाल तक्रारीचा तपास करण्याचा निर्णय घेतात, तर ते कोणत्याही यंत्रणेस (दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहीत) शक्य तितक्या लवकर तपास करण्याचे आणि तपास आदेशाच्या तारखेनंतर सहा महिन्यांचे आत पूर्ण करण्याचे निर्देश देतील.

परंतु असे की, लोकपाल हे सदर कालावधी पुढील सहा महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही, इतक्या कालावधीकरीता कारणे लेखी नमूद करून वाढवू शकतात.

६) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतीही यंत्रणा, ज्यात दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेचाही समावेश आहे, तिला लोकपालाने संदर्भित केलेल्या प्रकरणांच्या बाबत तपास अहवाल त्या कलमांतर्गत न्यायाधिकार क्षेत्र असलेल्या न्यायालयात प्रस्तुत करतील आणि त्याची एक प्रत लोकपालास प्रस्तुत करतील.

७) लोकपालाचे तीनपेक्षा कमी सदस्य नसलेले खंडपीठ त्यास उपकलम ६ नुसार कोणत्याही तपास यंत्रणा (दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहीत) कडून मिळालेला अहवाल घेईल आणि सक्षम प्राधिकारी आणि लोकसेवकाची टिप्पणी प्राप्त झाल्यानंतर-

अ) आपल्या अभियोग विभागास किंवा तपास विभागास लोक सेवकास आरोप पत्र दाखल करण्यास किंवा बंद अहवाल विशेष न्यायालयासमोर प्रस्तुत करण्यास अनुमती देईल;

ब) सक्षम प्राधिकाऱ्यास संबंधीत लोकसेवकाविरुद्ध विभाग चौकशी किंवा इतर योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश देईल.

८) लोकपाल हे उपकलम ७ अन्वये आरोप पत्र दाखल झाल्यानंतर निर्णय घेतल्यानंतर, आपल्या अभियोग विभागास किंवा इतर यंत्रणेस (दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहीत) सदर यंत्रणेने तपास केलेल्या प्रकरणांच्या बाबतीत विशेष न्यायालयात अभियोग प्रारंभ करण्यास निर्देश देईल.

९) लोकपाल प्राथमिक चौकशी किंवा तपासादरम्यान, प्रकरणपरत्वे, प्राथमिक चौकशी किंवा त्यास योग्य वाटल्यास तपासाशी संबंधीत दस्तावेजांच्या ताब्यासाठी योग्य ते आदेश पारीत करील.

१०) लोकपालाचे संकेत स्थळ हे वळोवेळी आणि नियमनांत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जनतेस, लोकपालासमोर प्रलंबीत आणि निपटारा झालेल्या तक्रींची संख्या प्रसिद्ध करील.

११) प्राथमिक चौकशी किंवा तपास किंवा प्रकरण चालविण्यासाठी किंवा विशेष न्यायालयास आवश्यक असल्यास मूळ दस्तावेज आणि पुरावे लोकपाल स्वतःकडे ठेवू शकतात.

१२) अन्यथा उपबंधीत केले असेल त्या व्यतिरिक्त, प्राथमिक चौकशी किंवा तपास करण्याची कार्यपद्धती आणि रीत (ज्यात लोकसेवकास दस्तावेज आणि साहित्य उपलब्ध करून देण्याचाही समावेश आहे) ही नियमनांत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.

**२१. बाधक परिणाम होऊ शकणाऱ्या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेणे :-**

जर कार्यपद्धतीच्या कोणत्याही टप्प्यावर, लोकपालाचे-

अ) आरोपीशिवाय इतर व्यक्तीच्या वर्तनाची चौकशी होणे आवश्यक आहे असे मत झाले; किंवा

ब) आरोपीशिवाय इतर व्यक्तीची प्रतिष्ठा ही प्राथमिक चौकशीनंतर बाधकरित्या प्रभावीत होऊ शकते असे मत झाले आहे.

लोकपाल त्या व्यक्तीला प्राथमिक चौकशीदरम्यान नैसर्गिक न्याय तत्वांनुसार त्याचे म्हणणे मांडण्याची व त्याचे बचावासाठी पुरावे प्रस्तुत करण्याची पुरेशी संधी देईल.

**२२. लोकपाल माहिती इ. पुरविण्यासाठी कोणत्याही लोकसेवकास किंवा इतर व्यक्ती आवश्यक करू शकतो :-**

या अधिनियमातील तरतूद, कोणतीही प्राथमिक चौकशी वा तपासाचा उद्देश, लोकपाल किंवा तपास यंत्रणा, प्रकरणपरत्वे, यांना कोणत्याही लोकसेवक किंवा इतर व्यक्तीकडून, जी त्यांचे मते प्राथमिक चौकशी किंवा तपासाशी संबंधीत माहिती देण्यास, दस्तावेज प्रस्तुत करण्यासाठी समर्थ आहे. अशा माहिती किंवा असा दस्तावेज प्रस्तुत करण्यास सांगू शकतो.

**२३. प्रारंभी अभियोगास अनुमती देण्याची लोकपालाची शक्ती :-**

१) फौजदारी व्यवहार संहिता, १९७३ च्या कलम १९७ मध्ये किंवा दिल्ली विशेष पोलीस अधिनियम, १९४६ कलम ६ ए किंवा भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम १९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, लोकपालास कलम २० च्या उपकलम ७ च्या खंड (अ)नुसार अभियोगास अनुमती देण्याची शक्ती राहील.

२) कलम (१) अन्वये आपली अधिकृत कर्तव्ये पार पाडत असताना किंवा कर्तव्य बजावणे अभिप्रेत असताना कोणताही अपराध केला असल्याचा आरोप असलेल्या कोणत्याही लोक सेवकाविरुद्ध चालविता येणार नाही आणि कोणतेही न्यायालय लोकपालाच्या पूर्वसंमतीविना अशा अपराधाची दखल घेणार नाही.

३) उपकलम १ व २ मध्ये समाविष्ट असलेली कोणतीही तरतूद घटनात्मक तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी पदभार स्वीकारलेल्या व्यक्तींना आणि त्याबाबतीत अशा व्यक्तींना पदच्युत करण्याची कार्यपद्धती ज्यात विनिर्दिष्ट केली आहे ती लागू होणार नाही.

४) उपकलम १, २ आणि ३ यातील तरतूदी या घटनेच्या कलम ३११ आणि कलम ३२० च्या खंड ३ च्या उपखंड क च्या तरतूदींना बाधक असणार नाहीत.

**२४. प्रधान मंत्री, मंत्री किंवा संसद सदस्य :-**

जिथे, तपास पूर्ण झाल्यानंतर, लोकपालाचे निष्कर्ष हे कलम १४ च्या उपकलम १ चे खंड अ, ब किंवा क मध्ये उल्लेखीत लोकसेवकाद्वारे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ नुसार अपराध असलेल्या कृत्याचा दोषी असल्याचे उघड

होते, लोकपाल हे विशेष न्यायालयात प्रकरण दाखल करू शकतात आणि अहवालाच्या प्रतिबरोबर त्याचे निष्कर्ष सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठवू शकतात.

## प्रकरण आठवे
## लोकपालाच्या शक्ती

**२५. लोकपालाच्या पर्यवेक्षकीय शक्ती :-**

१ ) लोकपालास दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेच्या कलम ४ मध्ये आणि केन्द्रीय दक्षता आयोग अधिनियम, २००३ च्या कलम ८ मध्ये काहीही समाविष्ट असले तरी, दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेवर पर्यवेक्षण करण्याच्या तसेच त्यांना लोकपालाने प्राथमिक चौकशी अथवा तपासासाठी, या अधिनियमानुसार निर्देश देण्याच्या शक्ती असतील.

परंतु असे की, या उपकलमांतर्गत पयृवेक्षकीय किंवा निर्देश देण्याच्या शक्तीचा वापर करताना, लोकपाल यांचा वापर अशा रितीने करणार नाही ज्यामुळे कोणत्याही यंत्रणेस (दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहीत) जिच्याकडे तपासकार्य देण्यात आले, कोणतेही प्रकरण विशिष्ट पद्धतीने तपास करून निकाली लावेल.

२ ) केन्द्रीय दक्षता आयोग, लोकपाल निर्देश देतील अशा अंतराने, आयोगाकडे कलम २० च्या उपकलम १ च्या दुसऱ्या परंतुकाद्वारे संदर्भित तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीबाबत लोकपाल निर्देशित करतील अशा अंतराने विवरणपत्र पाठवेल आणि असे विवरणपत्र प्राप्त झाल्यानंतर अशा प्रकरणांचा प्रभावी आणि लवकर निपटारा करण्यासाठी मार्गदर्शिका जारी करू शकतात.

३ ) दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेचा कोणताही अधिकारी जो, त्यास लोकपालाने सोपविलेल्या प्रकरणाचा तपास करीत आहे, लोकपालाच्या मान्यतेशिवाय त्याची बदली करता येणार नाही.

४) दिल्ली विशेष पोलीस आस्थापना, लोकपालाचया संमतीने, शासकीय अधिवक्त्यांव्यतिरिक्त लोकपालाने संदर्भित प्रकरणे चालविण्यासाठी अधिवक्त्यांची नामिका नियुक्त करू शकेल.

५) दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेच्या संचालकांना लोकपालाने संदर्भित केलेल्या प्रकरणांचा तपास करण्यासाठी लागतील तसा निधि केन्द्र शासन उपलब्ध करून देईल आणि अशा तपासासाठी झालेल्या खर्चासाठी संचालक उत्तरदायी असतील.

**२६. शोध आणि जप्ती :-**

१) जर लोकपालास कोणताही दस्तावेज हा या अधिनियमांतर्गत होणाऱ्या तपासासाठी उपयोगी किंवा संबंधीत आहेत व ती एखाद्या जागी लपविलेली आहेत असा सकारण विश्वास असेल, तर लोकपाल कोणत्याही यंत्रणेस (दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहीत), ज्यांना तपासकार्य सोपविले आहे असा दस्तावेज शोधण्यास व जप्त करण्यास अधिकृत करू शकतो.

२) जर ुपकलम १ नुसार जप्त केलेला दस्तावेज हा या अधिनियमातील तपासाकरीता पुरावा म्हणून वापरता येऊ शकतो आणि त्यासाठी दस्तावेज लोकपालाच्या ताब्यात ठेवणे किंवा अशा अधिकाऱ्याच्या ताब्यात ठेवणे आवश्यक राहील, तर लोकपाल असा दस्तावेज स्वतःच्या किंवा अधिकृत अधिकाऱ्याच्या ताब्यात तपास पूर्ण होईपर्यंत ठेवू शकतो.

परंतु असे की, जिथे एखादा दस्तावेज वापस करणे आवश्यक आहे, लोकपाल किंवा अधिकृत अधिकारी अशा दस्तावेजाच्या अधिकृत प्रति बनवून घेऊन तो दस्तावेज वापस करू शकतो.

**२७. काही प्रकरणांत लोकपालास दिवाणी न्यायालयांच्या शक्ती असणे :-**

१) या कलमातील तरतुदींच्या अधीन राहून कोणत्याही प्राथमिक चौकशीच्या उद्देशाकरीता लोकपालाच्या चौकशी विभागाला खालील प्रकरणातील दावा चालविताना, दिवाणी न्यायालयाला दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ अंतर्गत असणाऱ्या सर्व शक्ती असतील.

अ) कोणत्याही व्यक्तीला बोलावणे व उपस्थित राहण्यासाठी बाध्य करणे आणि त्याला शपथेवर तपासणे.

ब) कोणताही दस्तावेज प्रस्तुत करणे आणि शोधणे.

क) शपथपत्रावर पुरावा स्वीकारणे.

ड) कोणतेही सार्वजनिक अभिलेख कोणत्याही न्यायालय अथवा कार्यालयातून मागविणे.

इ) साक्षीदारांची तपासणी किंवा दस्तावेजांची तपासणी करण्यासाठी 'कमिशन' जारी करणे.

परंतु असे की, साक्षीदार असेल तर जिथे लोकपालांचे मते, लोकपाल समोरच्या कार्यवाहीत उपस्थित राहू शकत नाही तेव्हाच जारी केले जावे.

फ) विहित केले जाईल त्याप्रमाणे इतर प्रकरणात.

२) लोकपालासमोरील कोणत्याही कार्यवाहीला भारतीय दंड विधानाच्या कलम १९३ नुसार न्यायिक चौकशी मानले जाईल.

**२८. केन्द्र व राज्यशासनाचे अधिकाऱ्यांच्या सेवा वापरण्याची शक्ती :-**

१) कोणतीही प्राथमिक चौकशी किंवा तपास करण्याच्या उद्देशाने, प्रकरणपरत्वे, केन्द्र वा कोणत्याही राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकारी, संघटन किंवा तपास यंत्रणेच्या सेवांचा वापर करू शकतात.

२) अशा तपास किंवा चौकशी संदर्भातील प्राथमिक चौकशी किंवा तपासाच्या उद्देशाने, ज्या अधिकारी, संगठन किंवा यंत्रणेच्या सेवा उपकलम (१) अन्वये वापरल्या असतील, ते लोकपालाचे पर्यवेक्षण आणि निर्देशांचे अधीन असतील व -

अ) कोणत्याही व्यक्तीला बोलावणे व उपस्थित राहण्यासाठी बाध्य करणे आणि त्याला शपथेवर तपासणे.

ब) कोणताही दस्तावेज प्रस्तुत करणे आणि शोधणे; आणि

क) कोणतेही सार्वजनिक अभिलेख कोणत्याही न्यायालय अथवा कार्यालयातून मागविणे.

३) उपकलम २ अन्वये ज्या अधिकारी किंवा संगठन किंवा यंत्रणेच्या सेवा वापरल्या आहेत ते प्रकरणपरत्वे, कोणत्याही प्रकरणाची चौकशी किंवा तपास करून त्यांना या संदर्भात निर्देशित काळात, लोकपालास, केलेल्या तपासाचा किंवा चौकशीचा अहवाल प्रस्तुत करतील.

**२९. मालमत्तेवर तात्पुरती टांच :-**

१ ) जेथे लोकपाल किंवा त्याद्वारे अधिकृत कोणीही अधिकारी, यास त्याचे हातातील साहित्याधारे, विश्वास ठेवण्यास सबळ कारणे, जे लेखी नोंदलेले असावे-

अ) कोणीही व्यक्ती भ्रष्टाचाराद्वारे प्राप्त मालमत्ता बाळगून आहे आणि,

ब) अशी व्यक्ती भ्रष्टाचाराशी संबंधीत अपराधाची आरोपी आहे.

क) अशी अपराधी मिळकत ही लपविली, स्थानांतरीत किंवा अशा कोणत्याही प्रकारे तिचा व्यवहार केला जाऊ शकतो ज्याचा परिणाम लोकपाल किंवा त्याद्वारे अधिकृत अशी अपराधी मिळकत जप्त करण्यासंबंधी कार्यवाही निष्फळ ठरू शकते, लेखी आदेशाद्वारे अशा संपत्तीवर ९० दिवसांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या काळासाठी, आयकर अधिनियम, १९६१ चे दूसरे परिशिष्टातील रीतीने तात्पुरती टांच आणू शकतो. आणि लोकपाल आणि अधिकारी हे त्या परिशिष्टाच्या नियम १ च्या उपनियम ई नुसार मानद अधिकारी ठरतील.

२) लोकपाल किंवा याद्वारे अधिकृत अधिकारी हे उपकलम १ नुसार टांच आणल्यावर, लगेचच आदेशाची प्रत, त्याचे ताब्यातील साहित्यासहीत, ज्याचा उल्लेख उपकलमात केला आहे. विशेष न्यायालयाकडे, बंद लिफाफ्यात, न्यायालयाद्वारे विहित पद्धतीने सोपवतील आणि असे न्यायालय टांच आणण्याच्या आदेशाची मुदत वाढवू शकेल आणि असे साहित्य त्यास योग्य वाटेल तितक्या कालावधीसाठी बाळगू शकेल.

३) उपकलम १ नुसार केलेला टांच आदेश उपकलम १ मध्ये दिलेला कालावधी संपुष्टात आल्यानंतर किंवा विशेष न्यायालयाने उपकलम २ अन्वये निर्देशीत कालावधी संपुष्टात आल्यानंतर निष्प्रभ होईल.

४) या कलमातील कोणतीही बाब, उपकलम १ वा २ अन्वये टांच आणलेल्या स्थावर मालमत्तेत हितसंबंध असणाऱ्या व्यक्तीस तिचा उपभोग घेण्यापासून प्रतिबंध करू शकणार नाही.

**स्पष्टीकरण :-** उपकलमाच्या उद्देशासाठी, ''हितसंबंधी व्यक्ती'' यात अशा मालमत्तेवर दावा सांगणारे किंवा हक्कदार असणाऱ्या सर्व व्यक्तींचा समावेश होतो.

**३०. मालमत्तेवरची टांच कायम होणे :-**

१) लोकपाल जेव्हा कलम २९ च्या उपकलम १ नुसार कोणत्याही मालमत्तेवर तात्पुरती टांच आणतो, तो अशा टांचेपासून तीस दिवसांचे आत लोकपालाने त्याचे अभियोग विभागाच्या संचालकास विशेष न्यायालयासमोर अशी टांच आणण्यामागची तथ्ये मांडणारा अर्ज दाखल करण्यास आणि लोकसेवकावरील कार्यवाही विशेष न्यायालयासमोर पूर्ण होईपर्यंत अशी टांच कायम करण्याची प्रार्थना करण्याचे निर्देश देईल.

२) विशेष न्यायालय, जर त्यास तात्पुरती टांच आणलेली मालमत्ता ही भ्रष्ट मार्गाने मिळविलेली आहे अशा मताचे झाले तर, अशा मालमत्तेच्या टांचेचे आदेश लोक सेवकावर विशेष न्यायालयातील कार्यवाही पूर्ण होईपर्यंत कायम करण्याचे आदेश देऊ शकेल.

३) जर लोकसेवक पुढे त्याचेवर लावलेल्या आरोपातून मुक्त झाला, न्यायालयाच्या आदेशाच्या आधीन असणारी मालमत्ता, संबंधीत लोकसेवकास त्या मालमत्तेतून टांचेच्या काळात मालमत्तेवर मिळालेल्या लाभांसहित परत करण्यात यावी.

४) जर लोकसेवकास पुढे भ्रष्टाचाराच्या आरोपातून शिक्षा झाली तर भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ तील अपराधाशी संबंधीत मिळकत जप्त केली जाईल आणि केन्द्र शासनाकडे कोणत्याही जोखमीविना किंवा भाडेपट्टा हितसंबंधाशिवाय दिली जाईल यात बँक किंवा इतर वित्तीय संस्थेची देणी यांचा समावेश नाही.

**स्पष्टीकरण :-** यातील उपकलमाच्या उद्देशांसाठी, 'बँक' आणि 'वित्तीय संस्था' या अभिव्यक्तींचा अर्थ बँका व वित्तीय संस्थांना देय ऋणांची वसूली अधिनियम, १९९३ च्या कलम २ च्या खंड ड, ग आणि ह या खंडात दिल्याप्रमाणे असेल.

**३१. विशिष्ट परिस्थितीत भ्रष्ट मार्गाने निर्माण अथवा मिळविलेला लाभ, मालमत्ता, उत्पन्न, पैसा यांची जप्ती :-**

१) कलम २९ आणि ३० यांच्या तरतुदींना बाधक न ठरता, जिथे विशेष न्याया-लयास, सकृत दर्शनी पुराव्याआधारे, लाभ, मालमत्ता, उत्पन्न, पैसा, काहीही

नावाने संबोधले असेल, हे लोकसेवकाने भ्रष्ट मार्गाने कमवले किंवा निर्माण केले आहे, असे मानण्यास कारण असेल वा न्यायालयाची तशी खात्री झाली असेल, तर न्यायालय अशा लाभ, मालमत्ता, उत्पन्न, पैशावर लोकसेवकाचे सुटकेपर्यंत टांच आणण्याचे आदेश देईल.

२) उपकलम १ नुसार केलेली टांच आणण्याचे आदेश हे उच्च न्यायालयाद्वारे सुधारीत किंवा शून्यवत झाले असतील किंवा विशेष न्यायालयाने लोकसेवकास दोषमुक्त केले असेल, तर लाभ, मालमत्ता, उत्पन्न, पैसा, हे कलम १ नुसार जप्त केले आहेत, ते संबंधीत लोकसेवकास परत करण्यात यावेत आणि जर काही कारणाने असे लाभ, मालमत्ता, उत्पन्न, पैसा परत करणे शक्य नसेल तर लोकसेवकास त्यांची किंमत देण्यात येईल ज्यात ५ टक्के प्रति वर्ष या दराने जप्त झालेल्या पैशाचाही समावेश आहे.

**३२. भ्रष्टाचाराच्या आरोपाशी संबंधीत लोकसेवकाच्या बदलीची किंवा निलंबनाची शिफारस करण्याची लोकपालाची शक्ती :-**

जिथे लोकपाल भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करताना, उपलब्ध पुराव्यानुसार, लोकपालाचे सकृतदर्शनी समाधान झाले आहे की-

१) कलम १४ च्या उपकलम १ च्या खंड ड, इ किंवा फ मध्ये उल्लेखीत लोकसेवकाचे प्राथमिक चौकशीदरम्यान पदावर राहणे हे प्राथमिक चौकशीवर दुष्परिणाम करणारे ठरेल; किंवा

२) अशा लोकसेवक हा पुरावे नष्ट करू शकणार आहे किंवा साक्षीदारांना प्रभावीत करू शकणार आहे, तर लोकपाल केन्द्र शासनास अशा लोकसेवकाची त्याच्या पदावरून, आदेशात स्पष्ट केलेल्या काळापर्यंत बदली, अथवा निलंबन करावे अशी शिफारस करू शकेल.

३) केन्द्र शासन हे लोकपालाने उपकलम १ नुसार केलेली शिफारस, प्रशासकीय कारणांमुळे अशी कारणे लेखी नोंदवून असे करणे शक्य नसण्याचा अपवाद वगळता, साधारणपणे स्वीकार करील.

**३३. प्राथमिक चौकशी दरम्यान दस्तावेज नष्ट होण्यापासून प्रतिबंधीत करण्यासाठी निर्देश देण्याची लोकपालाची शक्ती:-**

लोकपाल, या अधिनियमानुसार कर्तव्याचे निर्वहन करताना, कोणत्याही

दस्तावेजाचे किंवा अभिरलेखांच्या रक्षणाची किंवा तयार करण्याची जबाबदारी सोपविलेला आहे अशा लोकसेवकास-

अ) अशा दस्तावेजाचे किंवा अभिलेखाचे नष्ट होण्यापासून रक्षण करणे किंवा

ब) लोकसेवकास असा दस्तावेज किंवा अभिलेख बदलण्यापासून किंवा लपविण्यापासून रोखणे.

क) भ्रष्ट मार्गाने मिळविलेली संपत्ती स्थानांतरीत किंवा अन्यसंक्रामित करण्यापासून लोकसेवकास प्रतिबंध करणे;

यासाठी योग्य ते निर्देश देऊ शकतो.

**३४. प्रत्यायोजनाची शक्ती :-**

लोकपाल, साधारण किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे आणि त्यात विहित अटी व मर्यादांच्या आधीन राहून, त्याला असलेली कोणतीही प्रशासकीय किंवा वित्तीय शक्ती इतर सदस्य किंवा अधिकारी किंवा कर्मचारी यांपैकी आदेशात स्पष्ट केल्याप्रमाणे अमूक द्वारे वापरण्याचे किंवा पार पाडण्याचे निर्देश देऊ शकतो.

## प्रकरण नववे

## विशेष न्यायालये

**३५. केन्द्र शासनाद्वारे विशेष न्यायालयांची स्थापना :-**

१) केन्द्र शासन, लोकपालाने शिफारस करील त्याप्रमाणे, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ किंवा या अधिनियमानुसार निर्माण होणारी प्रकरणांच्या सुनावणीसाठी आणि निर्णयासाठी, विशेष न्यायालयांची स्थापना करील.

२) उपकलम १ अन्वये स्थापित विशेष न्यायालये प्रत्येक सुनावणी प्रकरण दाखल झाल्याचे तारखेपासून १ वर्षाचे आत पूर्ण करण्याचे सुनिश्चित करतील.

परंतु असे की, जर सुनावणी एक वर्षाचे आत पूर्ण होऊ शकत नसल्यास, विशेष न्यायालय हे त्याची कारणे नोंदवील आणि सुनावणी पुढील कालावधी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही किंवा दर वेळी तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही व प्रत्येक त्रिमाहीचे शेवटी करणे लेखी नोंदवली जातील, मात्र असा एकूण कालावधी दोन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

**३६. काही प्रकरणात मित्र राज्यांना विनंतीचे पत्र पाठविणे :-**

१) या अधिनियमात आणि फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ मध्ये काहीही असले तरी, या अधिनियमातील अपराध किंवा इतर कार्यवाही संदर्भात प्राथमिक चौकशी किंवा तपासादरम्यान विशेष न्यायालयापुढे लोकपालाद्वारे अधिकृत अधिकाऱ्याने प्राथमिक चौकशी किंवा तपासासंदर्भात जो या अधिनियमातील अपराध किंवा इतर कार्यवाहीसंदर्भात चालू आहे त्यासंदर्भात आवश्यक आहे आणि तो मित्र-राज्यातील कुठल्याही ठिकाणी मिळू शकतो असे त्याचे मत आहे. आणि विशेष न्यायालयाला, असा पुरावा हा प्राथमिक चौकशी किंवा तपासासाठी, जो या अधिनियमातील अपराध किंवा इतर कार्यवाहीसंदर्भात चालू आहे त्यासंदर्भात आवश्यक आहे, अशी खात्री झाल्यास मित्र-राष्ट्रातील सक्षम प्राधिकारी किंवा न्यायालय यांना विनंती करणारे पत्र जारी करील ज्यात-

अ) प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थिती तपासण्यास;

ब) विशेष न्यायालय पत्रात स्पष्ट करील त्याप्रमाणे पाऊले उचलण्यास; आणि

क) एकत्र केलेला सर्व पुरावा पत्र पाठविणाऱ्या विशेष न्यायालयाकडे अग्रेषित करावा. अशी विनंती करील.

२) विनंती पत्र हे केन्द्र शासन याबाबतीत विहित करील अशा पद्धतीने व रीतीने प्रेषित केले जाईल.

३) उपकलम १ नुसार नोंदवले गेलेले प्रत्येक निवेदन किंवा दस्तावेज किंवा मिळालेली वस्तूस प्राथमिक चौकशी किंवा तपासादरम्यान गोळा केलेला पुरावा मानले जाईल.

## प्रकरण दहावे

## लोकपालाचे अध्यक्ष, सदस्य आणि अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रारी

**३७. लोकपालाचे अध्यक्ष आणि सदस्यांचे निलंबन आणि पदच्युती :-**

१) अध्यक्ष किंवा सदस्यांपैकी कोणाविरुद्ध झालेल्या तक्रारीची चौकशी लोकपाल करणार नाही.

२) उपकलम ४ च्या तरतुदींच्या आधीन राहून, सर्वोच्च न्यायालयाद्वारे किमान

१०० संसद सदस्यांच्या स्वाक्षरी असलेला अर्ज राष्ट्रपतींनी केलेल्या संदर्भाद्वारे प्राप्त झाल्यानंतर यासंबंधी विहित पद्धतीने केलेल्या चौकशी अध्यक्ष किंवा सदस्य, प्रकरणपरत्वे, यांना अशा आधारावर पदच्युत करणे आवश्यक आहे असा अहवाल प्राप्त झाल्यानंतर राष्ट्रपती गैरवर्तनाच्या कारणास्तव अध्यक्ष किंवा कोणत्याही सदस्यास पदच्युत करतील.

३) राष्ट्रपती अध्यक्ष किंवा कोणत्याही सदस्यास, ज्याचे विरोधात उपकलम २ अन्वये सर्वोच्च न्यायालयास संदर्भ केला गेला आहे व सर्वोच्च न्यायालयाची शिफारस प्राप्त झाली आहे अथवा अंतरीम अहवाल प्राप्त झाला आहे व सर्वोच्च न्यायालयाकडून अंतीम अहवाल प्राप्त होणे बाकी आहे तोपर्यंत पदावरून निलंबीत करू शकतो.

४) उपकलम २ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी; राष्ट्रपती, आदेशान्वये, अध्यक्ष किंवा अशा सदस्यास, प्रकरण परत्वे-

अ) नादार घोषीत झाल्यास; किंवा

ब) आपल्या कार्यकाळात, त्याचे कार्यालयीन कर्तव्यांव्यतिरिक्त एखाद्या सशुल्क सेवायोजन स्विकारले आहे; किंवा

क) राष्ट्रपतींच्या मते शारीरिक किंवा मानसिक दौर्बल्यामुळे काम करण्यास अयोग्य असल्यास पदच्युत करू शकतात.

५) जर अध्यक्ष किंवा कोणताही सदस्य, निगम मंडळाचा सदस्य आणि इतर सदस्यांबरोबर असल्यासारखा हा कोणत्याही प्रकारे कोणत्याही संविदा किंवा करारपत्राविषयी संबंधीत आहे किंवा हितसंबंधी आहे, जे भारतसरकार किंवा कोणत्याही राज्य सरकारच्या वतीने केले आहे किंवा त्यातील लाभाशी किंवा वित्तलब्धित सहभागी असल्यास, ज्यामुळे, उपकलम २ च्या उद्देशांकरीता गैरवर्तनाचा दोषी मानला जाईल.

**३८. लोकपालाचे कर्मचाऱ्यांविरोधातील तक्रारी :-**

१) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ नुसार दंडनीय अपराधाबद्दल, लोकपालांतर्गत किंवा सहकारी असलेल्या कोणत्याही वा कर्मचारी वा अभिकर्ता

(दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहीत) यांच्याविरोधात प्राप्त झालेली आरोप किंवा गैरवर्तनाची तक्रार ही या कलमाच्या तरतुदींप्रमाणे वागविली जाईल.

२) आरोपांची तक्रार प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत लोकायुक्त चौकशी पूर्ण करतील.

३) लोकपालांतर्गत किंवा सहकारी असलेल्या कोणत्याही अधिकारी वा कर्मचारी वा अभिकर्ता यांच्या विरोधात प्राप्त झालेल्या कोणत्याही तक्रारीची चौकशी करताना, उपलब्ध पुराव्यावरून जर सकृतदर्शनी त्याचे समाधान झाले आहे की-

अ) अशा अधिकारी वा कर्मचारी वा अभिकर्त्याचे चौकशी दरम्यान त्याचे पदावर राहण्यामुळे चौकशीवर दुष्परिणाम होऊ शकतो; किंवा

ब) लोकपाल किंवा यंत्रणा यांचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी हा पुरावा नष्ट करणार आहे वा पुराव्यासोबत छेडछाड करणार आहे किंवा साक्षीदारांना प्रभावित करणार आहे, तर लोकपाल आदेशान्वये अशा अधिकाऱ्याला वा कर्मचाऱ्यास निलंबीत करू शकतो किंवा अशा यंत्रणेची सर्व शक्ती व दायित्वे काढून घेऊ शकतो, दूर करू शकतो.

क) चौकशी पूर्ण झाल्यावर, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ नुसार अपराध घडला असल्याबाबत सकृतदर्शनी पुरावा आहे, तर अशी चौकशी पूर्ण झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत, लोकपालाच्या अशा अधिकारी वा कर्मचाऱ्यावर, लोकपालाशी संबंधीत यंत्रणेच्या अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यावर अभियोग चालविण्याचे आदेश देईल आणि संबंधीत अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करील.

परंतु असे की, लोकपालाच्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्याला, सहकारी यंत्रणेच्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्याला त्याचे म्हणणे मांडण्याची पूरेशी संधी दिल्याशिवाय असा कोणताही आदेश देता येणार नाही.

## प्रकरण अकरावे

# विशेष न्यायालयाद्वारे हानीचे मूल्यमापन आणि वसुली

**३९. विशेष न्यायालयाद्वारे हानीचे मूल्यमापन आणि वसुली :-**

जर कोणताही लोकसेवक हा भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अंतर्गत अपराधासाठी विशेष न्यायालयाद्वारे दंडीत झाला तर अस्तित्वात कोणत्याही

अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी आणि त्यास बाधा न आणता, अशा लोकसेवकाच्या कृत्यामुळे किंवा सद्‌हेतूने न घेतलेल्या निर्णयामुळे आणि ज्यासाठी त्याला शिक्षा झाली आहे; त्यामुळे जर हानी झाली असेल तर तिचे मूल्यमापन करील आणि अशा हानीच्या वसुलीचे आदेश, जर दंडीत लोकसेवकाकडून शक्य असल्यास जारी करील.

परंतु असे की, जर विशेष न्यायालय, कारणे लेखी नोंदवून, अशा निष्कर्षास आले की झालेली हानी ही दंडीत लोकसेवकाच्या लाभार्थीबरोबरच्या षडयंत्रातून केलेल्या कृत्यातून किंवा निर्णयाचा परिणाम आहे, तर अशी हानी, जर या कलमान्वये मूल्यमापन झाल्यानंतर, अशा लाभार्थी किंवा लाभार्थींकडून समप्रमाणात वसुल करण्यात यावी.

## प्रकरण बारावे

## वित्त, लेखा आणि लेखापरिक्षण

**४०. अर्थसंकल्प :-**

लोकपाल विहित पद्धतीने, दर आर्थिक वर्षात पुढील आर्थिक वर्षासाठी आपला अर्थसंकल्प तयार करील, त्यात लोकपालाचा अंदाजे खर्च आणि आय दाखविलेला असेल व हेच पत्रक केन्द्र शासनाला माहितीसाठी पाठवेल.

**४१. केन्द्र सरकारचे अनुदान :-**

केन्द्र शासन त्याचे वतीने संसदेने विधिद्वारे विनियोजन केल्यानंतर, अध्यक्ष, सदस्य यांचे वेतन व भत्ते आणि प्रशासकीय खर्च, ज्यात कर्मचारी आणि अधिकारी यांचे वेतन, भत्ते तथा निवृत्तीवेतन याचा समावेश आहे, यासाठी लागणारा पैसा लोकपाल अनुदानातून देईल.

**४२. लेखा वार्षिक विवरणपत्रे :-**

१) लोकपाल लेखा व इतर दस्तावेज योग्य रीतीने परिरक्षित करील तसेच लेखांचे वार्षिक विवरणपत्रे, केन्द्र शासन भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सल्ल्याने विहित केल्यानुसार प्रपत्रात तयार करील.

२) लोकपालाच्या लेखांचे लेखापरिक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षकाद्वारे हे विनिर्दिष्ट केल्यानुसार ठराविक कालावधीने केले जाईल.

३) या अधिनियमानुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक किंवा त्यांचेद्वारे नियुक्त इतर कोणीही व्यक्तीस लोकपालाचे लेखापरिक्षण करताना तेच हक्क, विशेषाधिकार आणि अधिकार असतील, जे शासनाच्या लेखांचे लेखापरिक्षण करताना असतात, विशेषतः त्यास लोकपालाचे पुस्तके, लेखा, संबंधीत व्हाउचर्स आणि इतर कागदपत्रे व दस्तावेज मागण्याचा हक्क असेल.

४) लोकपालाचे लेखा व लेखापरिक्षण अहवाल, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक किंवा त्यांचेद्वारे नियुक्त इतर कोणीही व्यक्तीने प्रमाणित केल्यानंतर, केन्द्र शासनाकडे दरवर्षी पाठविण्यात यावेत आणि केन्द्र शासन असे अहवाल संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर ते ठेवील.

**४३. केन्द्र शासनाकडे परतावे इ. भरणे :-**

लोकपाल केन्द्र शासनाकडे, उक्त वेळी आणि उक्त नमुन्यात आणि रीतीने, केन्द्र शासनाने विहित केल्याप्रमाणे किंवा विनंती करील त्याप्रमाणे, लोकपालाचे न्यायाधिकार क्षेत्रासंबंधी असे परतावे, विवरणपत्रे केन्द्र शासनास वेळोवेळी आवश्यक वाटेल, तसे पुरवतील.

## प्रकरण तेरावे

# मालमत्ता घोषीत करणे

**४४. मालमत्ता घोषीत करणे :-**

१) प्रत्येक लोकसेवक हा त्याची मालमत्ता तसेच दायित्वे या अधिनियमाद्वारे किंवा यात दिलेल्या रीतीने घोषीत करील.

२) लोकसेवक, त्याचे सेवेत प्रवेश करताना शपथ घेईल त्या दिनांकापासून तीस दिवसांचे आत सक्षम प्राधिकाऱ्याकडे खालील बाबींची माहिती पुरवील-

अ) तो, त्याची/तिची, पत्नी/पती आणि अवलंबून असणारी मुले, एकत्रितपणे किंवा विभिन्न मालकी किंवा लाभार्थी आहेत;

ब) त्याची, त्याचे/तिच्या, पतीची/पत्नीची दायित्वे तसेच त्याच्यावर अवलंबून मुले.

४) प्रत्येक लोकसेवक, सक्षम प्राधिकाऱ्याकडे, प्रत्येक वर्षातील ३१ जुलैच्या दिवशी किंवा आधी, उपकलम २ मध्ये उल्लेख केलेली मालमत्ता आणि दायित्वे यांची माहिती, त्या वर्षीच्या ३१ मार्चसारखी पुरवेल.

५) उपकलम २ किंवा ३ मधील आणि उपकलम ४ मधील वार्षिक माहिती विहित रीतीने आणि विहित नमुन्यात सक्षम अधिकाऱ्याला पुरवली जाईल.

६) अशी सर्व विवरणपत्रे ही दरवर्षी ३१ ऑगस्टपर्यंत अशा प्रत्येक मंत्रालय किंवा विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध केली जाईल हे संबंधीत मंत्रालयाचा सक्षम प्राधिकारी सुनिश्चित करील.

**स्पष्टीकरण :-** या कलमाच्या उद्देशाकरीता ''अवलंबून मुले'' अर्थात अशी मुले व मुली ज्यांना स्वतःची कमाई नाही जे त्यांच्या जीवीतासाठी पूर्णपणे लोकसेवकावर अवलंबून आहेत.

**४५. विशिष्ट प्रकरणात संपत्ती भ्रष्ट मार्गाने मिळवली आहे याबाबत गृहितक :-**

जर कोणी लोकसेवक ळेतुतः किंवा असमर्थनीय कारणांमुळे -

अ) त्याची मालमत्ता घोषीत करण्यास; किंवा

ब) अशा मालमत्तेबद्दल चुकीची माहिती देणारा आणि अघोषित अशी मालमत्ता ताब्यात असलेला आढळला, अशा वेळी, अशी मालमत्ता, जोपर्यंत उलट सिद्ध होत नाही, त्या लोकसेवकाच्या मालकीची आहे असे गृहित धरले जाईल व ती भ्रष्ट मार्गाने मिळविली आहे असे गृहित धरले जाईल.

परंतु असे की, सक्षम प्राधिकारी लोकसेवकास विहित किमान मूल्य न ओलांडणाऱ्या मालमत्तेची घोषणा करण्यापासून सूट देऊ शकतो.

## प्रकरण चौदावे

# अपराध आणि शिक्षा

**४६. खोट्या तक्रारीसाठी अभियोग आणि लोकसेवकास नुकसान भरपाई इ. :-**

१) अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जो कोणी, या अधिनियमांतर्गत खोटी आणि संत्रासजनक तक्रार करील, अपराध सिद्ध झाल्यास त्यास १ वर्षापेक्षा अधिक होणार नाही इतक्या कालावधीसाठी तुरूंगवास व दंड जो रुपये एक लक्षपर्यंत वाढू शकेल इतकी शिक्षा ठोठावण्यात येईल.

२) कोणतेही न्यायालय, विशेष न्यायालय वगळता, उपकलम १ मधील अपराधाची दखल घेणार नाही.

३) लंकपालाचे अधिकृत अधिकारी किंवा खोटी आणि जिच्याविरोधात खोटी आणि संत्रासजनक तक्रार दाखल झालेली आहे अशा व्यक्तीच्या तक्रारीचा अपवाद वगळता उपकलम १ मधील अपराधाची दखल कोणतेही विशेष न्यायालय घेणार नाही.

४) उपकलम १ मधील अपराधाच्या संदर्भात अभियोग, लोक अभियोक्त्याद्वारे चालविला जाईल आणि अशा अभियोगासंबंधी सर्व व्यय केन्द्र शासनाद्वारे उचलला जाईल.

५) या अधिनियमांतर्गत खोटी तक्रार केल्याबद्दल शिक्षा झालेल्या व्यक्तीस (व्यक्ती असो वा संस्था वा व्यक्तींचे संगठन किंवा न्यास (नोंदणीकृत असेल किंवा नाही) ज्याचेविरुद्ध खोटी तक्रार केली आहे अशा लोकसेवकाला विशेष न्यायालय ठरवील त्याप्रमाणे प्रकरण चालविण्यासाठी आलेला कायदेशीर खर्च तसेच नुकसान भरपाई द्यावी लागेल.

६) सद्भावाने केलेल्या तक्रारींविषयी या कलमास कोणतीही तरतूद लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण :-** या उपकलमातील उक्रेशांकरीता, सद्भाव अर्थात एखादी व्यक्ती एखादी गोष्ट जेव्हा प्रामाणिकपणे आणि यथायोग्य काळजी घेऊन व अवधान ठेवून केली जाते किंवा समजली जाते किंवा तथ्यविषयक चुलभुलीमुळे आपणाला विधितः समर्थन आहे असे भादंवि च्या कलम ७९ नुसार समर्थनीय ठरते.

**४७. संस्था किंवा व्यक्तींची संघटना किंवा न्यासा द्वारे केलेली खोटी तक्रार :-**

१) जिथे कलम ४६ च्या उपकलम १ अन्वये कोणताही अपराध हा संस्था किंवा व्यक्तींची संघटना किंवा न्यास (नोंदणीकृत असेल किंवा नाही) प्रत्येक व्यक्ती, अपराध केला गेला तेव्हा, प्रत्यक्षपणे सहभागी होती, आणि संस्था किंवा व्यक्तींची संघटना किंवा न्यास यासाठी यांच्या कामकाजासाठी, व्यवहार किंवा कार्यासाठी उत्तरदायी होती, अशी संस्था वा व्यक्तींची संघटना वा न्यास हे अपराधाचे दोषी मानले जातील व अभियोगास पात्र ठरून त्यानुसार दंडीत होतील.

परंतु असे की, या उपकलमातील काहीही अशा व्यक्तीस या अधिनियमातील कोणत्याही शिक्षेस पात्र ठरविणार नाही, जर अपराध हा त्याचे माहितीविना केला आहे किंवा असा अपराध घडण्यापासून रोखण्यासाठी त्याने सर्वतोपरी काळजी घेतली होती.

२) उपकलम १ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिथे संस्था किंवा व्यक्तींची संघटना किंवा न्यास (नोंदणीकृत असेल किंवा नाही) आणि असे सिद्ध झाले की, असा अपराध हा अशा संस्था, संघटना किंवा न्यासाच्या संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकसंमतीने किंवा त्यांच्याकडून झालेल्या दुर्लक्षामुळे घडला आहे, तर असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अधिकारी हे सुद्धा त्या अपराधाचे दोषी मानले जातील आणि त्यानुसार अभियोग चालवून दंडीत केले जातील.

## प्रकरण पंधरावे

## संकीर्ण

**४८. लोकपालाचे अहवाल :-**

केलेल्या कामाबद्दल वार्षिक अहवाल राष्ट्रपतींना सादर करणे हे लोकपालाचे कर्तव्य असेल आणि असा अहवाल प्राप्त झाल्यावर, राष्ट्रपती अशी प्रकरणे, ज्यात लोकपालाचा सल्ला स्विकृत झाला नाही, जर असतील, त्यांच्या अस्वीकृतीबद्दल स्पष्टीकरण देऊन तो अहवाल संसदेच्या दोन्ही सदनापुढे ठेवतील.

**४९. लोकपालाने अंमलात असलेल्या इतर विधीतून उद्भवणाऱ्या अपीलांचा अपीलीय प्राधिकारी म्हणून काम करणे-** कोणाही सार्वजनिक प्राधिकाऱ्याद्वारे सार्वजनिक सेवा पुरविण्याबाबत आणि सार्वजनिक तक्रारी दूर करण्याबाबतच्या अंमलात असणाऱ्या कोणत्याही विधीतील प्रकरणात ज्यामधील निर्णयात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ नुसार भ्रष्टाचाराचे निष्कर्ष आहेत, अशा प्रकरणात निर्माण होणाऱ्या सर्व अपीलाबाबत लोकपाल अंतिम अपेलेट प्राधिकारी असतील.

**५०. कोणत्याही लोकसेवकाने सद्भावाने केलेल्या कृत्याचे संरक्षण :-**

आपल्या अधिकृत कर्तव्याचे निर्वहन करताना किंवा शक्तीचा वापर करताना सद्भावाने केलेल्या किंवा सद्भावपूर्वक केलेल्या कोणत्याही कृत्यास या

अधिनियमातील कोणताही दावा, अभियोग किंवा इतर कायदेशीर कार्यवाही लागू होणार नाही.

**५१. इतर कोणीही सद्भावाने केलेल्या कृत्याचे संरक्षण :-**

लोकपाल किंवा कोणताही अधिकारी, कर्मचारी, यंत्रणा किंवा इतर कोणतीही व्यक्ती यांनी या अधिनियमांतर्गत, किंवा यातील नियम किंवा नियमनांतर्गत सद्भावाने केलेल्या कोणत्याही कृत्यास किंवा सद्भावपूर्वक केलेलया कृत्यास कोणताही दावा, अभियोग किंवा इतर कायदेशीर कार्यवाही लागू होणार नाही.

**५२. लोकपालाचे सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी हे लोकसेवक असतील :-**

लोकपालाचे अध्यक्ष, सदस्य, अधिकारी आणि इतर कर्मचारी हे या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींना अनुसरून केलेल्या कृत्यासाठी भारतीय दंड विधानाचे कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक मानले जातील.

**५३. काही प्रकरणात मर्यादा लागू होणे :-**

एखादी तक्रार जर तिच्यात उल्लेख केलेल्या अपराध जो केल्याचा आरोप आहे, तो घडल्याच्या दिनांकानंतर सात वर्षाचा कालावधी उलटल्यानंतर दाखल केलेली असेल, तर लोकपाल अशा कोणत्याही तक्रारीबाबत चौकशी किंवा तपास करणार नाही.

**५४. न्यायाधिकार क्षेत्रास रोध :-**

या अधिनियमांतर्गत किंवा अनुसार लोकपालास निर्णय घेण्यासाठी अधिकार प्रदान केले आहेत, अशा कोणत्याही प्रकरणासाठी कोणत्याही दिवाणी न्यायालयास न्यायाधिकार क्षेत्र नसेल.

**५५. कायदेविषयक सहाय्य :-**

लोकपाल ज्याच्याविरुद्ध, या अधिनियमांतर्गत, तक्रार केली गेली आहे अशा प्रत्येक व्यक्तीस, त्याचा बचाव लोकपालासमोर करण्यासाठी, असे सहाय्य देण्याची विनंती केली असल्यास, कायदेविषयक सहाय्य उपलब्ध करून देईल.

**५६. अधिनियमाचा अधिभावी परिणाम :-**

या अधिनियमातील तरतुदींचा, या अधिनियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही अधिनियमातील किंवा अशा कोणत्याही अधिनियमामुळे प्रभाव प्राप्त विलेखातील अंतर्भूत, जे या अधिनियमाशी कितीही विसंगत असेल, त्यावर अधिभावी असतील.

**५७. या अधिनियमातील तरतूदी या इतर विधिअतिरिक्त असतील :-**

या अधिनियमात असलेल्या तरतूदी या, अंमलात असलेल्या कोणत्याही विधिस अतिरिक्त असतील, न की त्यांचे न्यूनीकरण करणाऱ्या असतील.

**५८. काही अधिनियमितींमध्ये विशोधन :-**

परिशिष्टात दर्शविलेल्या अधिनियमितींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे विशोधन केले जाईल.

**५९. नियम बनविण्याची शक्ती :-**

१) केन्द्र शासन या अधिनियमातील तरतूदी अंमलात आणण्यासाठी अधिकृत राजपत्रात अधिसूचित करून, नियम तयार करू शकेल-

अ) कलम २, उपकलम १ चा खंड इ मध्ये उल्लेखीत तक्रारीचा नमुना

ब) कलम ४ उपकलम ५ मधील नामिकेची निवड पद्धती, शोध समितीचा पदावधी आणि तिच्या सदस्यांना देय असणारे शुल्क आणि भत्ते;

क) कलम १ उपकलम ३ च्या परंतुकांतर्गत केन्द्रीय लोकसेवा आयोगाच्या सल्ला-मसलतीनुसार नियुक्ती करावयाचे पद किंवा पदांसंदर्भात.

ड) कलम २७, उपकलम १ च्या खंड ४ नुसार अशी प्रकरणे ज्यासाठी लोकपालास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील.

इ) कलम २९, उपकलम २ नुसार विशेष न्यायालयाकडे साहित्यासोबत जप्तीचे अदेश अग्रेषित करण्याची रीत.

फ) कलम ३६ च्या उपकलम २ नुसार विनंती पत्र प्रसारीत करण्याची रीत;

ग) पुढील आर्थिक वर्षासाठी प्रत्येक आर्थिक वर्षी तयार करावयाचे अंदाजपत्रकाचा नमुना आणि वेळ, ज्यात कलम ४० नुसार लोकपालाचे अंदाजे प्राप्ती आणि व्यय दर्शविण्याचा आहे.

ह) कलम ४२, उपकलम १ नुसार लेखा आणि इतर अभिलेख तसेच लेखांचे वार्षिक विवरणपत्रांचे परिरक्षणाचा नमुना;

इ) कलम ४३ नुसार परतावे आणि विवरणपत्रे, माहितीसहीत, तयार करण्यासाठीचा वेळ, रीत आणि नमुना;

ज) कलम ४४, उपकलम ५ नुसार मागील वर्षीच्या कार्याचा गोषवारा असलेला वार्षिक परतावा तयार करण्यासाठीचा वेळ व नमुना;

क) लोकसेवकाद्वारे कलम ४४ च्या उपकलम ५ नुसार भरावयाचा वार्षिक परताव्याचा नमुना;

ल) कलम ४५ नुसार सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे लोकसेवकास संपत्तीविषयक माहिती पुरविण्यातून सूट किंवा माफी देऊ शकेल असे किमान मूल्य;

म) विहित करावयाचे आहे किंवा केले जाऊ शकेल असे कोणतेही प्रकरण.

**६०. नियमने बनविण्याची लोकपालाची शक्ती :-**

१) या अधिनियमातील तरतूदी आणि त्यातील नियमांच्या अधीन राहून, लोकपाल अधिकृत राजपत्रात अधिसूचना देऊन, उक्त तरतूदी अंमलात आणण्यासाठी नियमने बनवू शकतात.

२) विशेषतः आणि वर उल्लेखलेल्या शक्तीच्या साधारणतेस बाधक न ठरता, असे नियम खालीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रकरणासाठी असतील-

अ) कलम१०, उपकलम ४ नुसार, राष्ट्रपतीची मान्यता आवश्यक असणारी वेतन, भत्ते, रजा किंवा निवृत्ती वेतन इ.शी संबंधीत असणारी प्रकरणे आणि लोकपालाचे सचिव, इतर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सेवाशर्ती;

ब) कलम-१६, उपकलम १ च्या खंड फ नुसार लोकपालाचे खंडपीठांची स्थळे;

क) कलम-२०, उपकलम १० नुसार, लोकपालाचे संकेतस्थळावर प्रलंबीत किंवा निर्णय झालेल्या सर्व तक्रारी, त्यातील अभिलेख व पुराव्यासहीत प्रदर्शीत करण्याची रीत;

ड) कलम-२० च्या उपकलम ११ नुसार प्राथमिक चौकशी किंवा तपास करण्याची रीत व पद्धती;

इ) विहित करावयाचे आहे किंवा केले जाऊ शकेल, अधिनियमात विनिर्दिष्ट असे इतर कोणतेही प्रकरण.

**६१. नियम आणि विनियमने :-**

या अधिनियमान्वये तयार झालेला प्रत्येक नियम आणि विनियमन हे, ते तयार होताच,

संसदेच्या प्रत्येक सदनापुढे, सत्र चालू असताना, तीस दिवसांच्या कालावधीसाठी, जो एका सत्रात किंवा दोन किंवा अधिक लागोपाठ सत्रांत पूर्ण होईल आणि जर एका सत्राच्या शेवटी मांडला असेल तर पुढच्याच सत्रात किंवा उपरोक्त लागोपाठ सत्रांमध्ये, उभय गृहांनी एखाद्या नियम अथवा विनियमनामध्ये अपरिवर्तन करण्यास अथवा विशिष्ट नियम किंवा विनियमन बनविले जाऊ नये. याबाबत सहमती झाल्यास, अशा नियम अथवा विनियम, प्रकरणपरत्वे केवळ अपरिवर्ततीत रूपात प्रभावशील असेल किंवा निष्प्रभ असेल, मात्र असे कोणतेही अपरिवर्तन अथवा विलोपन हे त्या नियम अथवा विनियमांतर्गत जे काही पूर्वी केले गेले असेल त्याच्या वैधतेस बाधक नसेल.

**६२. अडचणी दूर करण्याची शक्ती :-**

१) जर अधिनियमातील तरतूदींना प्रभाव देण्यात कोणती अडचण उद्‌भवली तर, केन्द्र शासन, अधिकृत राजपत्रात आदेश जारी करून अशी अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतूदी करील. मात्र अशा तरतूदी या अधिनियमातील तरतूदींशी विसंगत नसतील.

परंतु असे की, अधिनियम प्रारंभ झाल्यापासून दोन वर्षाचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश जारी करता येणार नाही.

२) या कलमांतर्गत जारी झालेला प्रत्येक आदेश हा, जारी झाल्यानंतर लगेचच, संसदेच्या प्रत्येक सदनापुढे मांडला जाईल.

## भाग तीसरा

# लोकायुक्ताची स्थापना

**६३. लोकायुक्ताची स्थापना :-**

या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाचे आत, विशिष्ट सार्वजनिक कार्याधिकाऱ्यांविरोधातील भ्रष्टाचाराच्या तक्रारींबाबत, प्रत्येक राज्य हे नसल्यास राज्य विधान मंडळाने बनविलेल्या विधि अंतर्गत स्थापित, नियुक्त किंवा घटीत, त्या राज्यासाठी अशा संस्थेची स्थापना करील, जी लोकपाल या नावाने ओळखली जाईल.

## परिशिष्ट

## (क्र. ५८ पहावे)

## विशिष्ट अधिनियमितीत सुधारणा

### भाग पहिला

# चौकशी आयोग अधिनियम, १९५२ मधील सुधारणा

# (१९५२ चा साठावा)

कलम ३ च्या उपकलम १ मध्ये, ''समुचित शासन करील'' या शब्दांसाठी, ''लोकपाल व लोकायुक्त अधिनियम, २०१३ मध्ये उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, समुचित शासन करील'' हे शब्द, कंस आणि संख्या बदलले जातील.

### भाग दूसरा

# दिल्ली विशेष पोलीस आस्थापना अधिनियम, १९४६

## (१९४६ चा पंचवीसावा)

१. कलम ४ अ,-(१) उपकलम १ साठी खालील उपकलम घातले जाईल -

१) खालील सदस्यांच्या समितीच्या शिफारशीनुसार केन्द्र शासन संचालकाची नियुक्ती करील-

अ) प्रधानमंत्री-अध्य-;

ब) लोकसभेतील विरोधी पक्ष नेते-सदस्य;

क) भारताचे सरन्यायाधीश किंवा त्यांनी नामनिर्देशीत केलेले सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती-सदस्य;

२) उपकलम २ वगळण्यात येईल.

२. कलम ४ ब, नंतर खालील कलम समाविष्ट करण्यात येईल-

''४ ब, अ. (१) यासाठी या अधिनयमांतर्गत प्रकरणांचा अभियोग चालविण्यासाठी भारत सरकारचे सहसचिवाच्या दर्जापेक्षा कमी असणार नाही अशा अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालचे अभियोग संचालनालय असेल.

२) अभियोग संचालक हा संचालकाच्या एकंदरीत पर्यवेक्षण आणि नियंत्रणाखाली कार्य करील.

३) केन्द्र शासन केन्द्रीय द-ता आयोगाच्या शिफारशीनुसार अभियोग संचालकाची नेमणूक करील.

४) अभियोग संचालक हा त्याचे सेवाशर्तीत संबंधी नियमांत काहीही असले तरी त्याऐवजी त्याने पदभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून दोन वर्षपेक्षा कमी होणार नाही इतक्या कालावधीकरीता पदावर राहील.''

३. कलम ४ क च्या उपकलम १ साठी खालील उपकलम बदलण्यात येईल-

१) संचालक वगळता पोलीस पर्यवेक्षकाच्या पातळीवरील पदांवरची नेमणूक केन्द्र शासन करील आणि दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेतील अशा अधिकाऱ्यांच्या कार्यकालातील वाढ अथवा घट, खालील सदस्यांच्या समितीच्या शिफारशीनुसार करील-

अ) केन्द्रीय दक्षता आयुक्त-अध्यक्ष.

ब) दक्षता आयुक्त-सदस्य.

क) गृह मंत्रालयाचा पदभार असलेला भारत सरकारचा सचिव-सदस्य.

ड) कार्मिक मंत्रालयाचा पदभार असलेला भारत सरकारचा सचिव-सदस्य.

परंतु असे की, समिती तिच्या शिफारशी केन्द्र शासनाला सुपुर्द करण्याआधी संचालकाशी सल्लामसलत करील.

## भाग तीसरा

# भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८

## (१९८८ चा एकोणपन्नासावा)

१. कलम ७, ८, ९ आणि १२ -

अ) ''सहा महिने'' शब्दांऐवजी ''तीन वर्षे'' हे शब्द अनुक्रमे बदलले जातील;

ब) ''पाच वर्षे'' शब्दांऐवजी ''सात वर्षे'' हे शब्द अनुक्रमे बदलले जातील;

२. कलम १३ च्या उपकलम २ मध्ये-

अ) ''एक वर्ष'' या शब्दाऐवजी, ''चार वर्षे'' हे शब्द बदलले जातील.

ब) ''सात वर्षे'' या शब्दांऐवजी, ''दहा वर्षे'' हे शब्द बदलले जातील.

३. कलम १४-

अ) ''दोन वर्षे'' या शब्दांऐवजी ''पाच वर्षे'' हे शब्द बदलले जातील.

ब) ''सात वर्षे'' या शब्दांऐवजी ''दहा वर्षे'' हे शब्द बदलले जातील.

४. कलम १५ मध्ये, ''जे तीन वर्षापर्यंत वाढू शकेल'' शब्दांऐवजी ''जे दोन वर्षापेक्षा कमी असणार नाही आणि ५ वर्षापर्यंत वाढू शकेल'' हे शब्द बदलले जातील.

## भाग चौथा

# फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील सुधारणा

## (१९७३ चा दुसरा)

कलम १९७ मध्ये ''पूर्व परवानगी वगळता'' या शब्दानंतर लोकपाल व लोकायुक्त अधिनियम २०१३ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे समाविष्ट होतील.

## भाग पाचवा

# केन्द्रीय दक्षता आयोग अधिनियम, २००३

## (२००३ चा पंचेचाळीसावा)

१. कलम २ मध्ये खंड (ड) नंतर खालील खंड अंतर्भूत करण्यात येईल-

डअ)''सात''लोकपाल'' अर्थात लोकपाल व लोकायुक्त अधिनियम २०१३ च्या कलम ३ च्या उपकलम २ अन्वये स्थापीत लोकपाल.

२. कलम ८, उपकलम २ च्या खंड ब ध्ये खालील खंड अंतर्भूत करण्यात येईल-

(क) लोकपाल व लोकायुक्त अधिनियम, २०१३ च्या कलम २० च्या उपकलम १ च्या परंतुकान्वये लोकपालाने संदर्भित केल्यानंतर, उपकलम १ च्या खंड ड मध्ये उल्लेखीत व्यक्तींमध्ये-

१) केन्द्र शासनाच्या गट ब, क आणि ड सेवातील सदस्यांचाही समावेश असेल;

२) केन्द्र शासन अधिकृत राजपत्रात विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे केन्द्रीय अधिनियमांतर्गत स्थापित महामंडळे, शासकीय मंडळे, संस्था किंवा इतर स्थानिक प्राधिकारी ज्यांची मालकी किंवा नियंत्रण केन्द्र शासनाकडे आहे, अशा पातळीवरील अधिकारी किंवा कर्मचारी;

परंतु असे की, या खंडान्वये अधिसूचना जारी होईपर्यंत अशा महामंडळे, मंडळे, संस्था आणि स्थानिक प्राधिकारी सर्व अधिकारी किंवा कर्मचारी यांना उपकलम (१) च्या खंड (ड) मध्ये उल्लेखीत व्यक्ती मानले जाईल.

३. कलम ८ नंतर खालील कलमे अंतर्भूत होतील-

८ अ १) केन्द्र शासनाच्या गट ड आणि क सेवातील लोकसेवकांची भ्रष्टाचारासंबंधी प्राथमिक चौकशी किंवा तपास पूर्ण झाल्यानंतर, आयोगाची निष्कर्षात, लोकसेवकाला त्याचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी दिल्यानंतर, असे उघड झाले की, लोकसेवकाने सकृतदर्शनी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये भ्रष्टाचाराशी संबंधी वर्तन नियमांचा भंग झाला आहे, तर आयोग हा खालील पैकी एक वा अधिक कृती करील-

अ) कोणत्याही यंत्रणेद्वारा किंवा दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेद्वारे प्रकरण परत्वे तपास करवील.

ब) सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे संबंधीत लोकसेवकांविरुद्ध शिस्तभंग कार्यवाही किंवा इतर योग्य ती कार्यवाही करवील.

क) लोकसेवकाविरुद्धची कार्यवाही बंद करील आणि तक्रारदाराविरुद्ध लोकपाल व लोकायुक्त अधिनियम, २०१३ च्या कलम ४६ नुसार कार्यवाही करील.

२. उपकलम १ मध्ये उल्लेख केलेली प्रत्येक प्राथमिक चौकशी तक्रार प्राप्त झाल्याचे दिनांकापासून साधारणतः नव्वद दिवसांचे आत आणि लेखी नोंदवाव्या लागणाऱ्या कारणांकरीता पुढील नव्वद दिवसांचे आत पूर्ण केली जाईल.

८ ब. १) कलम ८ अ, उपकलम १ च्या खंड अ नुसार तक्रारीचा तपास करण्याचा निर्णय आयोगाने घेतला, तर आयोग कोणत्याही यंत्रणेस (दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहीत) तपास, शक्य तितक्या लवकर करण्याचे आणि आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आत पूर्ण करून त्याचा अहवाल निरीक्षणांसहीत आयोगाला प्रस्तुत करण्याचे निर्देश देईल.

परंतु असे की, आयोग असा कालावधी पुढील सहा महिन्यापर्यंत लेखी नोंदवावे लागतील अशा कारणांसाठी वाढवू शकेल.

२. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतीही यंत्रणा (दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहीत) तिला आयोगाने संदर्भित केलेल्या प्रकरणाबाबत, तपास अहवाल आयोगाकडे सुपुर्द करेल.

३. उपकलम २ अन्वये, कोणत्याही यंत्रणेकडून (दिल्ली विशेष पोलीस आस्थापनेसहीत) प्राप्त झालेला प्रत्येक अहवाल, आयोग विचारात घेईल आणि त्यानुसार-

अ) लोकसेवकाविरुद्ध विशेष न्यायालयात आरोप पत्र किंवा समाप्ति पत्र दाखल करावे.

ब) सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे संबंधीत लोकसेवकाविरुद्ध शिस्तभंग कार्यवाही किंवा इतर योग्य ती कार्यवाही करावी याविषयी योग्य तो निर्णय घेईल.

४. कलम ११ नंतर खालील कलम अंतर्भूत केले जाईल-

-११ए. १) लोकपालाने आयोगाकडे संदर्भित केलेल्या प्रकरणांची प्राथमिक चौकशी करण्यासाठी, चौकशी संचालक असेल, ज्याचा दर्जा भारत सरकारच्या सह-सचिवाच्या दर्जापेक्षा कमी नसेल आणि त्याची नेमणूक केन्द्र शासनातर्फे केली जाईल.

२) केन्द्र शासन चौकशी संचालकास, या अधिनियमांतर्गत त्याची काय पार पाडण्यासाठी आवश्यक असे अधिकारी आणि कर्मचारी उपलब्ध करून देईल.